म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

लेखक गोविंद नारायण

स्थान

संग्रहालय क्रमांक १२ / ३३२

पुस्तकाचें नांव सत्यनिरूपण

१२
सं क्र.

# सत्यनिरूपण.

निबंध।

म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

सं. नं. २३८

सन - १८८७

PARCHURE'S
HOME
BOOK - STOCK
NO- 84

संग्रहालय.

# THE OBSERVANCE OF TRUTH,

WITH

SPECIAL REFERENCE TO THE ADMINISTRATION OF JUSTICE AND THE ADVANCEMENT OF THE BEST INTERESTS OF SOCIETY:

## A WILLOUGHBY PRIZE ESSAY.

BY

THE LATE

GOVIND NÁRÁYAN,

TEACHER IN THE FREE GENERAL ASSEMBLY'S INSTITUTION.

THIRD EDITION

PUBLISHED BY JAGANNATH GOVIND

Bombay:

PRINTED AT THE NIRNAYA-SAGAR PRESS

1877.

# सत्यनिरूपण.

न्यायप्रकरणांत व लोकांच्या कल्याणवृद्धींत सत्यतेचें रक्षण करण्यानें किती लाभ होतात याविषयीं.

कैलासवासी

**गोविंद नारायण यांनीं केलें.**

त्याची तिसरी आवृत्ति

**जगन्नाथ गोविंद यांणीं**

मुंबईमध्यें,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केली

सन १८७७.

## प्रस्तावना.

सांप्रत हें **भरतखंड इंग्रजलोकांच्या** स्वाधीन झालें आहे; आणि उत्तरोत्तर त्यांची सत्ता सर्व राज्यांवर होत चालली, यास्तव बहुतकरून सार्वभौम पदवी त्यांसच; असें म्हटलें असतां साजेल. आतां, ज्या लोकांची आपण रयत झालों, त्यांजकडून अधिकार मिळवून घेण्यास व त्यांची प्रीति संपादन करून घेण्यास आपल्या अंगीं कोणकोणतीं साधनें असावीं, व आपलें आचरण कसें असावें, याचा कांहीं तरीं नियम असला पाहिजे.

या **भरतखंडाच्या** राज्याचा उपभोग **मराठे, मुसलमान** आदिकरून बहुतेकांनीं घेतला; परंतु कोणत्याच सरकारानें लोकांच्या सुधारणुकीकडे व विद्यावृद्धीकडे व रयतेच्या कल्याणाकडे तादृश लक्ष दिल्हेंच नाहीं. आतां ईश्वरकृपेनें हें राज्य **इंग्रज सरकाराच्या** हस्तगत झाल्यापासून सर्वत्र विद्येचा प्रसर होऊन व्यापाराची वृद्धि झाली; आणि लोकांमध्यें स्वतंत्रता, व सुखाचीं साधनें वाढून अज्ञानाचाहि लोप होत चालला आहे.

रयतेवर सरकाराची प्रीति बसावयास मुख्य दोन साधनें आहेत. सत्यता आणि विद्वत्ता; हे दोन गुण ज्याच्या अंगीं आहेत, तो कोठेंहि गेला तरी पार पडेल. यास्तव सद्गुणांची वृद्धि होण्यास नीति व विद्येचा उद्देश, यांवर ग्रंथ रचून ते सर्वत्र प्रवृत्तींत आणण्यासाठीं सर्वांचे परिश्रम असले पाहिजेत.

दुर्गुण व दुर्व्यसनें यांच्या स्वाधीन झाल्यामुळें असत्याची वृद्धि होती; तेणेंकरून परस्परांवरची प्रीति व विश्वास नाहींसा होऊन राज्यामध्यें नानाप्रकारचे दंगे, बंडें, हीं उत्पन्न होतात.

मग अर्थातच सरकारचा रयतेवरील विश्वास उडून तें मोठालीं हुद्यांचीं कामें देण्यास दिक्कत करितें.

हल्लीं **इंग्रज सरकार** एतद्देशीय लोकांस विश्वासू हुद्याचीं कामें देण्यास कांक्षा धरितें; याचें कारण बहुतकरून हेंच असावें, कीं ह्या लोकांच्या प्रमाणिकपणाविषयीं त्याची अजून पुरती खात्री झाली नाहीं. यास्तव जशी सर्वत्र विद्येची वृद्धि होऊं लागली आहे, तसीच सत्याची आणि प्रमाणिकपणाची वृद्धि होऊं लागली, म्हणजे सरकाराची खात्री होतील; मग तीं कामें आपणांस श्रम न करितां सहजच प्राप्त होईल. सत्य हें केवळ प्रापंचिक सुख प्राप्त होण्यासच उपयोगी आहे, असें केवळ नाहीं; तर पारमार्थिक सुखाचें साधन आहे.

हा ग्रंथ रचण्याचा आशय इतकाच, कीं चहूंकडे असत्याचा प्रसर झाला आहे, तो मोडून लोकांचीं मनें सत्याकडे लागावीं. सर्व लोक असत्य बोलणारे आहेत, असें केवळ आमचें ह्मणणें नाहीं, परंतु बहुतांचीं मनें असत्याकडे वळत चाललीं. तीं सत्य मार्गांत आणायाकरितां हे प्रयत्न आहेत.

सत्य, ह्या विषयावर यथामति ग्रंथ रचून विद्वज्जनांच्या सेवेंत सादर करावा, असी पुष्कळ दिवस इच्छा होती, इतक्यांत लोकहितेच्छु नेक नामदार **विलबी** साहेब **मुंबईतील** माजी **कौन्सलेर** यांजकडून या विषयावर कोणी चांगला ग्रंथ रचिला असतां त्यास इनाम मिळेल, असी जाहिरात सन १८५१ च्या अकटोबर महिन्याच्या **ओरिएन्टल खिस्तीअन स्पेकटेटर** पत्रावरून वाचण्यांत आली. त्यावरून मोठ्या उमेदीनें हा ग्रंथ रचिला. यांत कोठें व्यंगोक्ति आढळल्यास विद्वज्जनानीं क्षमा करून हा प्रयत्न मान्य करून घ्यावा.

# अनुक्रमणिका.

पृष्ठ.

१ मनुष्यमात्राच्या सुखास सत्याच्या अवश्यकते-
चा विचार........................... १

२ सत्याविषयीं प्रमाणें.......................... ७

३ प्रमाणिकपणाविषयीं उदाहरणें............... २५

४ असत्याचे प्रकार............................ ३९

५ असत्यामुळें संकटें येतात याविषयीं विचार. ५४

६ असत्य मार्गानें संपादन केलेलें द्रव्य लयास
कसें जातें, याविषयीं उदाहरणें........ ५८

७ न्यायप्रकरणीं असत्य बोलल्यानें किती अन-
र्थ होतात, व सत्यापासून किती लाभ
होतात, याविषयीं....... ....... ........ ६१

८ असत्याची प्रवृत्ति होण्याचीं कारणें........ ८१

९ सत्याची वृद्धि होण्याचे उपाय........... ८६

मि. ९८०

# सत्यनिरूपण.

## मनुष्यमात्राच्या सुखास सत्याच्या अवश्यकतेचा विचार.

ईश्वराने हें जग उत्पन्न करून त्यांत मनुष्यास इतर सर्व प्राण्यांत श्रेष्ठ केलें आहे. त्यास ज्ञान, बुद्धि, विवेकसंपन्न करून त्याच्या अंगीं शांति, क्षमा, दया, इत्यादि गुणहि ठेविले आहेत; आणि तो आपल्या ज्ञानादिकांचा कसकसा उपयोग करितो, हें कौतुक पाहावें, ह्मणून त्याला अवश्यक नेम लावून दिल्हे. ते असे कीं, सर्वकाळ सत्यच बोलावें; कोणाचा द्वेष करूं नये; चोरी करूं नये; आईबापांची आज्ञा मोडूं नये, इत्यादि. सर्वकाळ मनुष्याने आपणासच शरण यावें, ह्मणून ईश्वराने असी व्यवस्था करून ठेविली आहे. आणि जे गुण त्याजमध्यें ठेविले व जे नेम त्याला लावून दिल्हे, ते चालविण्यास सामर्थ्यहि दिल्हें आहे. तसेंच जें आपण करितों, तें योग्य किंवा अयोग्य हें समजावें, ह्मणून अंतःकरणांत सुप्रेरकशक्ति ठेविली, कीं जेणेंकरून मनुष्य आपल्या पापाचा आपणच

अधिकारी होऊन त्याचा बाध ईश्वराकडे लागू करीत नाहीं.

मनुष्यास जे दुसरे गुण व नेम लावून दिल्हे, त्यांत सत्य ह्मणून जो अप्रतिम नेम तो सर्वांस प्रिय असून कल्याणकारक व त्यांच्या सर्व सुखास उपयोगीं आहे. त्यावांचून ह्या सृष्टींतील कोणताहि व्यवहार चालणार नाहीं. सत्याच्या साह्यावांचून प्रपंचसंबंधी एकहि कर्म सुरळीत व्हावयाचें नाहीं. जर आज ह्या पृथ्वीवरून सत्य अगदीं नाहींसें झालें, तर मोठा अनर्थ होईल. त्यामुळें कोणी कोणावर विश्वास ठेवणार नाहीं. आईबाप व मुलें यांचा परस्परांवरील भरंवसा नाहींसा होईल; भाऊबहिणींचा एकमेकांवर विश्वास राहणार नाहीं; तसाच बायकोस नवऱ्याच्या बोलण्याचा खरेपणा वाटणार नाहीं; व धनी, चाकर यांचाहि परस्परांवरील प्रमाणिकपणा राहणार नाहीं. याप्रमाणें सर्व प्रकारचा अव्यवस्थितपणा माजला जाईल. यास्तव परम दयाळू भगवंताने आह्मास सत्य हा मोठा सुखदायक नेम लावून दिल्हा; त्याचा जर आह्मी धिक्कार केला, तर मग आमचा नाश होईल, यांत अगदीं संशय नाहीं.

हा कल्याणकारक सत्यरूप सद्गुण आमच्या अंतःकरणांत आहे, त्याचें सेवन करण्याकरितां द्रव्य

किंवा मोठे श्रम केले पाहिजेत, असें नाहीं. सत्य बोलणें फार सुलभ खरें, परंतु त्याविषयीं नेम धरून चालणें हेंच दुर्घट आहे. सत्य ह्मणजे जें कांहीं आपण पाहतों, व ऐकतों, त्यांत कांहीं फेरफार व कृत्रिम न करितां जसें असेल, तसेंच सांगावें. आणि दुसऱ्यास कोणत्याहि गोष्टीविषयीं वचन दिलेहें असतां तें पालन करून कोणाचाच विश्वासघात करूं नये. त्यामुळें आपलें अनहित होऊन जरीं नाश होत असला तरीं सत्याचा कधींहि त्याग करूं नये. "तूं आपला जीव रक्षण करण्यासाठीं देखील असत्याचा स्वीकार करूं नको." असें ईश्वरी वचन आहे. आपला उत्पन्नकर्त्ता जो भगवान् त्याला ओळखून त्याजपासीं जाण्यास सत्य ही एक पहिली पायरी आहे. जे लोक सत्याकडे दुर्लक्ष करून वागतात, त्यांजपासून कोणतेंहि सत्कर्म घडलें, तरीं तें ईश्वरापासीं रुजू होतच नाहीं. "सत्यंब्रवीमिपरलोकहितार्थं" परलोक प्राप्त व्हावा, ह्मणून मी सत्य बोलतों. असें एक साधु ह्मणतो.

सत्य आहे, ह्मणून सर्व कामें नीट चालतात; नाहीं तर कोणताहि व्यवहार सरळ चालणार नाहीं. मोठीं कामें तर असोत; परंतु आपल्या घरांतील हलकीं कामें देखील सत्यावांचून बंद पडतील. पाहा! एखाद्या वेळेस आपण कुटुंबांतील मनुष्यांवर व इतर लोकांवर

विश्वास बसल्यामुळें मोठमोठालीं नाजूक कामें सोंपितों; याचें कारण हेंच, कीं आपला त्यांच्या प्रमाणिकपणावर विश्वास बसलेला असतो. आतां असत्यवादी दुसऱ्यास ठकवितात, याचें कारण असें, कीं त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेविल्यामुळें सत्यवादी फसले जातात. ते जें बोलतात, तें सत्य आहे, असी समजूत पाडण्यास खोट्याचें खरें करून वेषधारी लांडग्याप्रमाणें वागत असतात. खोटें बोलणें हें महापातक आहे. ह्याविषयीं असें वचन आहे, कीं "नानृतात्पातकंपरं". पृथ्वीवर कांहीं तरीं सत्य आहे, ह्मणूनच मोठमोठाल्या पेढ्या व लाखों रुपयांचा व्यापार चालला आहे. कारण सत्याच्या योगानें लोकांचा एकमेकांवर विश्वास बसतो. जर एखादा व्यापारी लबाड, असें ठरलें, तर त्याचा व्यापार अगदीं चालत नाहीं. कित्येक लोकांचा असा समज आहे, कीं द्रव्यसंपादन करण्यास व व्यापार चालविण्यास असत्य बोलावें लागतें, तर ही या लोकांची मोठी चूक आहे. असत्याचा आश्रय केला असतां एखाद्यास तूर्त लाभ होतो खरा, परंतु परिणामीं तें उघडकीस आलें, ह्मणजे त्याचा कोणी विश्वास धरीत नाहींत. मग अर्थातच त्याचा व्यापार लवकर बुडून जातो. जर ह्या जगांत सर्व लोक प्रमाणिकपणानें वागतील, तर पृथ्वीवर खून,

मि-१८


चोरी, चहाडी, ऋण इत्यादि कुकर्मं फार थोडीं होतील. असें झालें असतां लोकांचीं मनेंहि बहुतकरून परमार्थाकडे लागतील. तर असा जो हा अपूर्व गुण, त्याचें अवलंबन करून सुख प्राप्त करून घेण्याचें सोडून विनाकारण दुःखांत कां पडावें बरें ?

एका गृहस्थाने आपल्या मुलीचा विश्वास आपणावर बसून तिला सत्याचा भेद समजत नसे, तो समजवावा, ह्मणून असी युक्ति केली, कीं त्याने एका दिवसीं बाहेर जाते वेळेस आपल्या मुलीस सांगितलें, कीं मी बाहेर जातों. आतां ह्या घड्याळांत एक तास झाला आहे, मी तीन तासांत परत येईन; परंतु मुलीचा त्या सांगण्यावर विश्वास बसेना. मग त्याने तिला फिरून सांगितलें, कीं मी लबाडी बोलत नाहीं; तर तूं मजवर विश्वास ठेवून मी सांगितलेल्या वेळांत परत येतों, किंवा नाहीं हें पाहा. असें सांगून तो बाहेर गेला; आणि जरीं त्याला सांगितलेल्या वेळेपेक्षां अर्ध घटिका अधिक वेळेचें काम होतें, तरीं उशीर न करितां नेमलेल्या वेळीं घरीं येऊन मुलीस बोलला, कीं पहा! सांगितल्याप्रमाणें मी आलों कीं नाहीं ? असीं त्याने बहुत वेळां तिला सत्याचीं उदाहरणें दाखविलीं. मग त्या मुलीची खात्री झाली, कीं आपला बाप असत्य बोलत नाहीं, याप्रमाणें त्या

गृहस्थानें सत्योत्पादक गोष्टींकडून त्या मुलीचा विश्वास आपल्यावर बसवून तिला लहानसहान कारणांवरून देखील ठकविलें नाहीं. यावरून ती मुलगी सत्याचा आणि असत्याचा भेद समजूं लागून मोठी सद्गुणी झाली. यास्तव लाहान मुलांस आपण कधींहि ठकवूं नये.

**हिरोडोटस्** नामें एका पुरातन इतिहासकर्त्यानें **इराण** लोकांचा वृत्तांत लिहिला आहे; त्यांत तो असें ह्मणतो, कीं इराणी लोक आपल्या मुलांस ह्या तीन गोष्टी शिकवायास फार श्रम घेत असत. एक, घोड्यावर बसणें; दुसरें, तीर मारणें; तिसरें, सत्य बोलणें. यावरून स्पष्ट दिसतें कीं, ते सत्यावर फारच लक्ष देत, व सत्य हा मोठा सद्गुण आहे असें मानीत असत.

सत्यावर लोकांची भक्ति असती खरी; परंतु प्रापंचिक हिताकडे लक्ष गेलें, ह्मणजे ते केवळ अंध होऊन सत्याकडे दुर्लक्ष करितात. सत्याच्या गोष्टी ऐकून कित्येक फार संतोष पावतात; आणि सत्यवक्ता पाहून त्याची स्तुतिहि करितात; परंतु त्याप्रमाणें वर्तणूक करण्यास धजत नाहींत; कारण त्यांच्या अंगीं पारमार्थिक धैर्य कमी असतें.

पहा ! एखाद्या लहान मुलास, तूं लबाड आ-

हेस; असें सहज ह्मटलें, तर तें त्यास वाईट वाटून मोठी शिक्षा केल्यासारिखें रडत असतें; परंतु मोठेपणीं दुराचरणांत पडल्यामुळें त्यास सत्यासत्याचा भेद समजत नाहींसा होतो.

कोणी अहंकारानें असी प्रतिज्ञा करूं नये, कीं मी सर्वकाळ सत्यानेंच वागेन. कारण, ह्या प्रपंचांत आपला एकमेकांसीं संबंध जडल्यामुळें एखाद्या वेळेस आपल्या किंवा आप्तांच्या ऐहिक कल्याणाकडे लक्ष गेल्यानें तो नेम मोडला जातो. याप्रमाणें सत्याच्या नेमाचें संरक्षण करण्यांत अनेक विघ्नें येतात. तर अशा प्रसंगीं आपल्याकडून सत्याचें रक्षण व्हावें, ह्मणून सर्वकाळ ईश्वरासच शरण जावें, ह्मणजे तो धैर्य देईल; तेणेंकरून कोणत्याच गोष्टीविषयीं अडचण पडणार नाहीं.

---

## सत्याविषयीं प्रमाणें.

नह्यसत्यात्परोधर्म इतिहोवाचभूरियम् ॥
सर्वंसोढुमलंमन्ये ऋतेलीकपरंनरम् ॥

अर्थ—पृथ्वी असें ह्मणती, कीं असत्यापेक्षां दुसरा मोठा अधर्म नाहीं. मी सर्व सहन करीन; परंतु असत्य भाषण करणाऱ्याचा भार मला साहत नाहीं.

सतिया सत् छोडे नहीं जोडे निदान;
तुलसी दया न छांडे बे जबलग घटमो प्रान.

जो सत्यवक्ता पुरुष, तो सत्य सोडून पाप जोडीत नाहीं. यास्तव तुलसीदास असें ह्मणतो, कीं हे मनुष्या! यावत् देहांत प्राण आहे, तावत् दया आणि सत्य कधीं सोडूं नको.

सत्यवचन और लीनता, परस्त्री मातसमान;
येतेसो न मिले भगवान्, तो तुलसीदास जमान.

**खिस्ती** शास्त्रांत असें लिहिलें आहे, कीं ज्याच्या तोंडांतून असत्य शब्द निघतात, त्याचें तोंड देवासमोर अमंगल आहे.

**सादी** ह्मणून इराणी लोकांत एक मोठा प्रख्यात कवि होऊन गेला. तो सत्याविषयीं असा बोध करितो—"हे माझ्या अंतःकरणा! तूं लक्ष लावून श्रवण कर. जर तूं सत्यानें वागसील, तर तुला काळ आणि मित्र किंबहुना सर्व सुखें देखील अनुकूल होतील, पाहा शाहणे मनुष्य सत्याचा त्याग कधीं करीत नाहींत कारण तेणेंकरून मनुष्यांची सुकीर्ति होती. तूं सत्यानें चालून सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें पापरूपी अंधकाराचा नाश करसील, तर तूं अमूल्य आहेस. सत्याशिवाय भाषण करूं नको; कारण उजवी बाजू डाव्या बाजूपेक्षां उत्तम आहे. सर्व सृष्टींत सत्यापेक्षां दुस

कांहींच चांगलें नाहीं. सत्याच्या वृक्षास कांटा नाहीं; असत्यापेक्षां दुसरें कांहींच वाईट नाहीं; त्यामुळें अपकीर्ति होती. जो असत्यमार्गानें चालतो, त्याची परलोकीं कसी सुटका होईल? इहलोकीं असत्यानें मनुष्याची अपकीर्ति होऊन, त्यास लज्जा प्राप्त होती. खोटें बोलणें असें आहे, कीं जसी एखादी जखम बरी झाली, तरीं तिचा वण राहातो, तसेंच एकदां असत्य बोलूं लागला, ह्मणजे तीच सवय पडती. मग तो खरें बोलला, तरीं त्याजवर कोणी विश्वास ठेवीत नाहींत. लबाड लोकांस आपापले हातानेंच ईश्वर शासन करवितो. जरीं मनुष्य प्राणिमात्रामध्यें श्रेष्ठ आहे, तरीं त्यानें असत्याचा स्वीकार केला, ह्मणजे तो नीचापेक्षांहि नीच होतो, असें समजावें."

**थिबेट** देशांत लासा नामें एक शहर आहे, तेथील लोकांच्या एका ग्रंथांत सत्याविषयीं असें लिहिलें आहे, कीं अरे धन्य पुरुषा! सत्याचें सौंदर्य पाहून जर तूं मोहित झाला अससील, आणि त्याच्या निष्कृत्रिम साधेपणाचा जर त्वां आश्रय केला असेल, तर तूं त्याचे पाय बळकट धरून त्याला कधीं सोडूं नको; ह्मणजे तूं सकळ गुणसंपन्न होसील. जो सत्यवादी आहे, त्याची जिव्हा धन्य आहे. त्याच्या अंतःकरणांत ढोंग, आणि कपट, यांस राहावयास ठिकाण मिळत

नाहीं. असा पुरुष असत्य भाषण ऐकून फार दुःखी होतो, आणि सत्य बोलायाच्या वेळीं पुढें सरसावून येतो; त्या वेळीं त्याला स्फुरण येतें. जे जे शब्द त्याच्या अंतःकरणांतून निघतात, ते ते ग्रहण करण्याजोगेच असतात, तो मित्राप्रमाणें उपदेश करून निस्पृहवृत्तीनें असत्यवाद्यांस दोष लावितो.

आतां पाहा ! लबाडी करणाऱ्या पुरुषाची जिव्हा वरचेवर फिरती. तो खोटी शपथ वाहून असत्य शब्द सत्यासारिखे करून दाखवितो; परंतु त्याच्या आयुष्याचे दिवस लोकांस ठकविण्यांत जातात, तो असें समजतो कीं मी निर्भय आहें; परंतु त्याची लबाडी जेव्हां उजेडांत येती तेव्हां अप्रतिष्ठा मात्र होऊन जाती. तो सत्त्वशील मनुष्यासारिखा वेष धारण करावयास श्रम करितो खरा, परंतु शेवटीं खोट्या मसलतीखालींच दडपून जातो. अरे मूर्खा अधमा ! तूं आपलें स्वरूप लपवायास जी खटपट करितोस, तीच तुझें कृत्रिम उघडकीस आणण्यासाठीं कारणभूत होती.

**ग्रीक** देशांतील एक विख्यात **प्लेटो** नामक कवि सत्याविषयीं असें ह्मणतो; सत्य भाषण ऐकण्यासारिखी दुसरी कोणतीहि आनंदकारक गोष्ट नाहीं आणि प्रमाणिक मनुष्याबरोबर भाषण करण्यासारिखें दुसरें सुख नाहीं; कारण तो भोळेपणानें ऐकून घेऊन दुसऱ्यास

ठकवावें, हें त्याच्या ध्यानींमनींहि नसतें, सत्यवादी लोकांचें भाषण केवळ सरळ; कारण ते फारसे शब्द-चातुर्याकडे लक्ष देत नाहींत. त्यांजकडून न्यायाधिशास शपथ घेण्याचा प्रसंग येत नाहीं.

**आरिस्टाटल्** नामक दुसरा एक कवि असें ह्मणतो, कीं असत्य बोलणें हें अति नीच कर्म जो करितो तो आपल्यास गुलामाप्रमाणें हलका करून घेतो.

**इंग्लंड** देशांतील **जान्सन्** नामक एक मोठा विद्वान् पुरुष सत्याविषयीं असें ह्मणतो; सत्याचें उल्लंघन करण्यासारिखा दुसरा मोठा दोष नाहीं. जर सत्य सुटेल, तर जगांतील व्यवहार बुडाला, असें समजावें. जर सर्व लोक लबाडी बोलूं लागतील, तर प्रत्येक मनुष्यास वेगवेगळें होऊन आपापला उदरनिर्वाह करण्याकरितां जंगलांत जाऊन राहावें लागेल. असत्य बोलणें हें अघोर पातक आहे; आणि यामुळें एकमेकांवर मोठा जुलूम होतो, असें सर्वांनीं मानावें. लबाड मनुष्याची मर्यादा वेश्येच्या मर्यादेसारखी; त्याचें हांसणें खुनी मनुष्यासारिखें, आणि त्याचें चुंबन मृत्यूसारिखें आहे. सत्य हें केवळ मनुष्यास भूषण आहे, असें केवळ नाहीं; तर तें त्याच्या उदरनिर्वाहाचेंहि साधन आहे, त्यापासून श्रीमंतांस प्रतिष्ठा येती; आणि गरिबांचा तर खजिनाच आहे.

व्यापारांत सत्य बोलण्यानें नुकसान आलेलें परवडतें; परंतु जो असत्य बोलून द्रव्य कमावितो, तो मालाबरोबर आपल्या आत्म्यासहि विकून त्याला नरकांत नेतो; असें निखालस समजावें. अरे मनुष्या! तूं मौजेकरितांहि लबाडी करूं नको. कां ! अशा लबाडीमुळें मोठे अनर्थ घडतात. जो दुसऱ्यास खुश करण्यासाठीं आपल्या आत्म्याचा नाश करून घेतो, त्या मूर्खास काय ह्मणावें ?

**लार्ड बेकन्** या नामेंकरून एक मोठा विद्वान् पुरुष होऊन गेला. त्यानें सत्यावर निबंध लिहिला आहें, त्यांत तो असें ह्मणतो. जर सर्व लोक सत्यानें वागतील आणि एकमेकांवर प्रीति करून ईश्वरावर भरंवसा ठेवितील, तर हा मृत्युलोक केवळ स्वर्गलोकासारिखाच आहे, यांत कांहीं संशय नाहीं. जसें समुद्रकांठीं उभें राहून, तुफानांत सांपडलेलें जहाज पाहाण्यास कांहीं दुःख वाटत नाहीं किंवा लढाई होत असतां किल्ल्यांतील मोठ्या वाड्याच्या खिडकींत बसून लढाईचा सर्व प्रकार पाहाण्यास भय वाटत नाहीं, तसेंच सत्याच्या उंच पदावर राहून असत्यवादी लोकांचा कृत्रिमभाव पाहाण्यास कांहीं भीति वाटत नाहीं; कारण त्यापासून लीनता, दया, हे सद्गुण उत्पन्न होऊन ईश्वराच्या पवित्र लीलेचें स्मरण होतें

लहानसहान कामांतही जे सत्य बोलतात, त्यावरून असें लक्षांत येतें, कीं मनुष्याची मूळस्थिति प्रमाणिक होती; परंतु जे असत्य बोलतात, ते मनुष्यजातीचा नीचपणा दाखवितात. सत्यांत असत्य बोलणें असें आहे, कीं जसें दुधांत मीठ मिश्रित करावें तसें. पाहा ! जसी सोन्याची किम्मत डांख लागल्याने उतरून जाती, तद्वत् मनुष्याचीहि किम्मत असत्य बोलण्याने उतरून जाती.

**आडिसन्** या नांवाचा एक विद्वान् असें ह्मणतो; ईश्वराने मनुष्यांची स्थिति असी करून ठेविली आहे, कीं त्यांच्या मागें असंख्यात दुःखें येतात; असें असतांहि मनुष्यांची तृप्ति न होतां ते असत्य, अति लोभ, मत्सर, निंदा, द्वेष, कपट, इत्यादि दुर्गुणांहींकरून, व नानाप्रकारच्या दुराचरणेंकरून नेहमीं आपल्या दुःखाची वृद्धि करीत असतात. जर लोक एकमेकांचा स्नेह बाळगून व ईश्वराचें भय धरून त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवितील, तर ह्या पृथ्वीवरील बहुतेक दुःखें दूर होतील, यांत कांहीं संशयच नाहीं. यास्तव आपल्या सुखाची वृद्धि व्हावी, ह्मणून प्रत्येकाने सद्गुण वाढविण्यासाठीं यत्न करावा.

इंग्लंड देशांत **आटरबरी** ह्मणून एक धर्माध्यक्ष होता त्याच्या स्नेही मंडळीने एकवेळ त्याला असी

विनंती केली, कीं महाराज ! आपण घरांत नेहमी फार उद्योगांत असतां; त्यामुळें तुमची दुसऱ्यास भेटायाची इच्छा नसती. तेव्हां, जर कोणी तुह्मास भेटावयास आला, तर चाकराकडून असें सांगावें, कीं मी घरांत नाहीं. ह्मणजे तुमच्या कामांत व्यत्यय न येतां सर्व कामें सुरळीत चालतील. चाकरांकडून सांगितलें असतां ती लबाडी नाहीं; कारण बहुतकरून लोकांस माहितच आहे, कीं आपण नेहमी फार उद्योगांत असतां. असें ऐकून घेऊन त्याने उत्तर केलें. मित्र हो ! तुह्मी सांगतां, याविषयीं माझी खातरी होत नाहीं. बरें असो; परंतु मला इतकेंच समजतें, कीं असी वर्त्तणूक करणें हें ख्रिस्तीधर्माध्यक्षास फार अयोग्य आहे.

चीन देशांतील **टीसीयंग** बादशाहा राज्य करीत असतां आपल्या रयतेवर जुलूम करूं लागला. त्या वेळीं बारा सत्यवाद्यानी एकत्र मिळून असा निश्चय केला, कीं पुढें काय होणार तें होवो; परंतु राजाच्या वास्तविक दुर्गुणांविषयीं त्यास खरा बोध करून लोकांस दुःखांतून मुक्त करावें. प्रथम त्यांतील एकाजणाने बादशाहापासीं जाऊन त्याच्या गैरवर्तणुकीविषयीं उपदेश करण्यास आरंभ केला. त्यामुळें राजाने त्याचा शिरच्छेद करविला. याचप्रमाणें पुढें दाहाजणांची अवस्था तसीच झाली, तथापि शेवटला मनांत



कांहींच भय न बाळगितां बादशाहाकडे एक शस्त्र घेऊन गेला; आणि उभा राहून ह्मणाला, कीं हे बादशाहा! त्वां आपल्या गरीब रयतेचा नाश मांडिला, हें तूं काय करितोस ! मी तर अशा दुष्ट राजाच्या राज्यांत राहून कंटाळलों. यास्तव आपला शेवट करावयास मी एथें आलों आहें. असें त्याचें धैर्य आणि सत्वस्थपणा पाहून राजाच्या अंतःकरणांत कांहीं द्रव उत्पन्न झाला, आणि त्याची प्रशंसा करून त्याच्या उपदेशाप्रमाणें पुढें आपली वर्त्तणूक ठेवूं लागला. सत्यवक्त्या पुरुषाचें हेंच मुख्य लक्षण आहे, कीं जरी प्राण गेला, तरीं तो सत्य कधीं सोडीत नाहीं.

**अमेरिकेंत जनराल वाशिंग्टन्** नामें मोठा विख्यात योद्धा होऊन गेला. तो पूर्ववयांत असतां, दुसऱ्या मुलांसारिखें सुरी, चाकू घेऊन खेळायाची त्याला हौस असे. एका दिवसीं तो हातांत चाकू घेऊन आपल्या बागेंत फिरत असतां बापानें एक फार सुंदर कलम लाविलें होतें, तें त्याने कापून टाकिलें. नंतर कांहीं वेळाने त्याचा बाप बागेंत गेला; आणि पहातो, तों त्या आवडत्या कलमाचा कोणी नाश करून टाकिला. असें पाहून त्यास मोठा राग आला; आणि हें काम कोणी केलें, याविषयीं तो मोठी चौकशी करूं लागला. तेव्हां **वाशिंग्टनाने** पाहिलें, कीं

या वेळेस आपला बाप चाकरांवर फार रागें भरला आहे; तर आपण त्यास खरा मजकूर सांगावा, हेंच उत्तम असें मनांत आणून तो बापास ह्मणाला; बाबा, हें काम मजपासून झालें. असें त्याचें धैर्य व खरी व- हिवाट पाहून बापास मोठा संतोष झाला; मग त्या मु- लास पोटाशीं धरून शाबासकी दिली आणि तेव्हां- पासून तो त्याजवर फारच प्रीति करूं लागला.

लंडन् शहरांतील ख्रिस्ती धर्मशास्त्रपुस्तकांचा संग्र- ह करणाऱ्या मंडळीस एक गृहस्थ कांहीं वार्षिक वर्ग- णी देत असे. ती त्याच्या एका दासीने पाहून तीहि आपल्या मिळकतींतून कांहीं अंश त्या धर्मकृत्यास दे- ऊं लागली; त्या वेळीं तिला एक ख्रिस्तीशास्त्राचें पुस्त- कहि मिळालें तें ती नेहमी वाची. एका दिवशीं पूर्व- वत् तिच्या धन्याने तिला सांगितलें, कीं कोणी मला शोधायास आला असतां मी घरांत नाहीं, ह्मणून सांग- तें ऐकून ती ह्मणाली, ही गोष्ट मी करणार नाहीं. अ- सत्य कसें बोलूं? तेव्हां धन्याने विचारिलें, कीं हें अस- त्य असें तुला कशावरून समजलें? ती ह्मणाली, मी ख्रिस्ती शास्त्र वाचीत असतें. त्यांत लिहिलें आहे, कीं "तूं लबाडी बोलूं नको." असें असतां मी तें कसें करूं? हें ऐकून तो गृहस्थ मोठा रागें भरून ह्मणा- ला, कीं ह्या मंडळीच्या योगाने माझी दासी बिघडून

गेली; आतां मी इतःपर त्या मंडळीस वर्गणी देणार नाहीं. पुढें त्या सभेच्या अध्यक्षानें त्याची समजूत चांगलेपणें केली, तेव्हां तो सुधारून दुप्पट वर्गणी देऊं लागला.

डाकतर **जान्सन्** या नांवाचा एक विख्यात विद्वान् आपल्या एका जिवलग मित्रास असा उपदेश करीत होता, कीं " मित्रा ! सर्वकाळ आपल्या मुलांस सत्य बोलण्याची सवय लागे, असें कर. जेणेंकरून ती कोणत्याहि स्थितींत सुटणार नाहीं." त्या वेळीं एक संभावित स्त्री जवळ होती, ती हें ऐकून असें बोलली, हें काय ! असी गोष्ट कसी घडेल? एकादी गोष्ट सांगावी लागली, ह्मणजे त्यांत हजारों तऱ्हेचे फेरफार सहज होतात. तर असला नेम धरून कसा परिणाम लागेल ? आणि त्याप्रमाणें सर्वकाळ मुलांस कोण जपत राहील ? हें ऐकून तो ह्मणाला, बाई ! इतक्याचसाठीं मी सांगतों, कीं आपण सत्याविषयीं फार चौकसीनें वागावें, असत्याचा जो एव्हढा फैलावा झाला, तो केवळ कोणी बुद्ध्या केला असें नाहीं; परंतु बहुतकरून सत्यावर दुर्लक्ष असल्यामुळें वाढत गेला.

कोणीएक शिक्षागुरु, ही पुढील गोष्ट सांगतो, एका दिवसीं शाळेंतील मुलगा गैरहजीर असल्यामुळें मी त्याच्या घरीं समाचारासाठीं गेलों; तों त्याची आई भेटली. तिनें

मला असें सांगितलें, कीं " माझा मुलगा कांहीं उद्योग पाहावयास गेला आहे; परंतु तो पुढें शाळेंत नेमाप्रमाणें येत जाईल. इतक्यांत तिने शेजारच्या मुलाविषयीं असी गोष्ट सांगितली, गुरुजी! तो मुलगा कधीं लबाड बोलत नाहीं; असें त्याची आई बोलत असती, तर हा किती स्तुत्य गुण आहे? बरें, ज्या धन्याच्या घरीं सध्या तो चाकरी करितो, तोहि माझ्या ओळखीचा आहे. त्यास म्यां याविषयीं पुसलें; तेव्हां त्याने असें सांगितलें, कीं हा मुलगा कामांत फार हुशार, असें केवळ नाहीं; परंतु त्याच्या अंगीं एक मोठा वर्णनीय गुण आहे तो असा; जरीं त्याचें नुकसान होत असलें, तरीं तो असत्य कधीं बोलतच नाहीं. जरीं त्याच्या हातून एखादा लहान मोठा अपराध झाला तरीं तो लागला कबूल होतो. पाहा! हा मुलगा किती सद्गुणी आहे माझ्या मुलाच्या अंगीं असा गुण आला, ह्मणजे पुरे असी मी ईश्वरापासीं प्रार्थना करित्यें."

**फ्रान्स** देशांत एका जाहागीरदाराची स्त्री मोठी प्रमाणिक आणि सत्यवादी असे. एका दिवसीं असें झालें कीं तिने राजावर आपल्या एका आश्रितास शिफारसपत्र दिल्हें होतें, तें राजाने कबूल केलें नाहीं. त्या वेळीं तिला वाईट वाटल्यामुळें ती राजास कांहीं अपशब्द बोलली. तेथें राजाचा कोणीएक खिसमत-

गार जवळ होता, त्याच्या कानीं ते शब्द पडतांच त्याने जाऊन राजास सांगितलें. मग राजाने ती गोष्ट तिच्या वडील भावास कळविली; त्याने ऐकतांच राजास सांगितलें, कीं हें केवळ विपरीत आहे; ही गोष्ट मला खरी वाटत नाहीं. माझी बहीण काय वेडी झाली? ती आपणास असे शब्द बोलेल? राजा ह्मणाला, असी गोष्ट असतां जर तुमची बहीण नाकबूल होईल, तर मीहि तें मान्य करीन. तिच्या खरेपणावर माझा पूर्ण विश्वास आहे. मग तिचा भाऊ लागलाच घरीं गेला, आणि बहिणीस विचारिलें, तेव्हां तिने खरा वृत्तांत त्यास निवेदन केला. तें ऐकून त्याचें मन फार खिन्न होऊन तो बहिणीस ह्मणाला; ताई? ही एवढी गोष्ट तूं राजासमोर नाकबूल हो; कारण, म्या राजाची खात्री केली, कीं तुजपासून असें होणार नाहीं. या प्रसंगीं असत्य बोललें असतां राजापासीं तुझी व माझी आब्रू राहून त्याच्या मनांत कांहीं कलंक राहाणार नाहीं. याप्रमाणें त्याने पुष्कळ वेळपर्यंत तिची विनवणी केली; तथापि ती ह्मणाली, "भाऊ! तूं काय मला असत्य बोलावयास सांगतोस? छिः छिः, एवढी गोष्ट तूं मला सांगूं नको. अरे! जे शब्द माझ्या तोंडांतून निघाले, ते मी कसे नाकबूल जाऊं आणि तूंहि सांगतोस, कीं माझ्या खरेपणावर रा-

जाचा भरंवसा आहे; तर मी त्यास कसें ठकवूं? काय म्या आपला अपराध देवापासीं आणि राजापासीं अधिक वाढवावा ? नाहीं; नाहीं; असी गोष्ट मी कधीं करणार नाहीं. ज्या गृहस्थाने माझी गोष्ट राजास कळविली, त्यालाहि माझ्याने चाहाडखोर ह्मणवणार नाहीं. कारण जें माझ्या तोंडांतून निघालें, तें त्याने राजास सांगितलें. असो, जसें त्याला उचित दिसलें, तसें त्याने केलें." असें बोलून ती उगीच राहिली. मग दुसऱ्या दिवसीं ती राजाच्या घरीं स्वतः गेली, आणि चरणावर मस्तक ठेवून तिने झालेला वृत्तांत निवेदन केला. तो ऐकून राजास तिच्या सत्यशीलपणाविषयीं मोठा आनंद झाला; आणि त्या दिवसापासून तिच्या खरेपणावर राजा फार विश्वास ठेवूं लागला.

इंग्लंड देशांत एक पतिव्रता स्त्री होती, तिची गोष्ट असी वाचण्यांत आली, कीं ही बाई आपल्या भर्त्यावर अप्रतिम प्रीति करीत असे. एका समयीं राजाची त्याजवर इतराजी झाल्यामुळें त्याने त्यास धरून कैद करावयासाठीं शिपाई पाठविले. त्या वेळीं ते आपल्या नवऱ्याला धरायास येत आहेत, असें जेव्हां त्या स्त्रीनें पाहिलें, तेव्हां तिने त्याला दूर पळवून असें गुप्त ठिकाण दाखविलें, कीं जेणेंकरून तो त्यांच्या हातीं सा

पडणार नाहीं, असा बंदोबस्त करून आपण दरवाज्यांत येऊन उभी राहिली. आणि दाखविलेल्या ठिकाणीं तो पोहंचेपर्यंत शिपायांस तिने घरांत येऊं दिल्हें नाहीं. तेव्हां त्या शिपायांनीं क्रोधाविष्ट होऊन हें सर्व वर्त्तमान राजास जाऊन सांगितलें. त्या वेळीं राजाने असा हुकूम केला, कीं त्या बाईलाच कैद करून आणा. नंतर त्यांनीं तिला राजापासीं नेलें असतां राजाने विचारिलें; "तुझा नवरा कोठें आहे? तो दाखवून दे, म्हणजे तुला सोडून देतों." तें ऐकून तिने उत्तर केलें, कीं "मी त्याला लपवून ठेविलें आहे खरें; परंतु ती गोष्ट केवळ मलाच ठाऊक; जरीं माझा प्राण घेतला, तरीं मी कधीं सांगणार नाहीं. जो पति मला प्राणापेक्षांहि अधिक, व ज्याच्या वांचून हें शरीर व्यर्थ; त्याच्या प्राणाचें दोन घटका जरीं रक्षण होत असलें, तरीं मी आपला जीव देण्यास तयार आहें. आणि तो कोठें आहे, हें मला ठाऊक असून नाहीं म्हणून सांगावें, असा असत्याचा अंगीकार मी करणार नाहीं. आतां जी शिक्षा करावयाची असेल, ती करावी." असें तिचें धैर्य व पातिव्रत्य पाहून राजास समाधान वाटलें, आणि अभयवचन देऊन तिच्या नवऱ्याच्या अपराधाची क्षमा केली.

ओरांग म्हणून युरोपखंडामध्यें एक देश आहे. ते-

थील **मारीस** नामक राजावर कोणी बंड केलें असतां तो वहमा एक सत्वस्थ **बारनिवेट्** या नांवाच्या पुरुषावर आला; तेव्हां राजानें त्यास धरून कैद केलें, आणि चौकशीअंतीं कांहीं खोट्या साक्षी मिळाल्यावरून त्याला फांशीं द्यावें, असें ठरविलें. त्या समयीं राजाने त्याच्या घरांतील मनुष्यांस व बायकोस सांगून पाठविलें, कीं हा अपराध तुह्मीं कबूल कराल, तर मी त्यास सोडून देतों; परंतु तें त्या गृहस्थाने किंवा त्याच्या बायकोने अथवा त्याच्या कुटुंबांतील कोणीच मनुष्याने कबूल केलें नाहीं. मग कांहीं दिवसांनंतर असें घडून आलें, कीं ह्या भल्या मनुष्याच्या दोघां मुलानी राजास ठार मारावयाची मसलत केली असतां ती उघडकीस आली; त्यामुळें त्यांस धरून कैद करण्याचा हुकूम झाला; परंतु त्या दोघांतून एक पळून गेला, आणि एकास कैद केलें; मग त्याचा तपास करून त्यास फांशीं द्यावें, असें ठरलें. तेव्हां त्या मुलाच्या आईने राजाच्या घरीं जाऊन त्याच्या पायांवर डोई ठेविली, आणि मोठा आकांत करून प्रार्थना करूं लागली, कीं "महाराज! ह्या माझ्या मुलास जीवदान द्या." त्या प्रसंगीं राजास मोठें आश्चर्य वाटून तीस विचारिलें, कीं "जेव्हां तुझ्या पतीस फांशीं दिल्हें, तेव्हां त्या तुह्मी

सर्वांस निरोप पाठविला असतां तुह्मीं कोणी येऊन त्याची सुटका न करितां त्याचा जीव जाऊं दिल्हा; आणि हल्लीं ह्या मुलाचा जीव वांचविण्यासाठीं तूं एवढी प्रार्थना करितीस हें काय!" तेव्हां तिनें उत्तर केलें, कीं "महाराज! माझा पति निर्दोषी होता; यास्तव असत्य बोलून प्राणाचें रक्षण करावें, यांत फळ काय? ह्मणून आह्मीं कोणी पुढें झालों नाहीं. आतां हा मुलगा खरा अपराधी, सबब मी आपणापासीं क्षमा मागावयास आल्यें आहें; तर महाराजानी सर्वस्वीं आज्ञावर कृपा करावी."

इंग्लंड देशांतील एका गांवांत एक ढोंगी राहत असे. त्याचा उद्योग असा होता, कीं कोणाचे ग्रह व सामुद्रिकलक्षणें पाहून त्यास शुभाशुभ फळ सांगावें. याप्रमाणें तो पुष्कळ वर्षें गांवोगांवीं फिरून आपला उदरनिर्वाह चालवीत असे. एका दिवसीं तो आपल्या एका यजमानाच्या घरीं पूर्ववत् गेला असतां यजमानीन बाईस नवीनच मूल झालें होतें. त्या संधीस जोशीबावा आले, हें पाहून बाईस आनंद झाला, कीं आतां आपल्या मुलाचीं लक्षणें समजण्यांत येतील. असें मनांत आणून ती बाई आपल्या मुलास जोशीबावासमोर आणून विचारूं लागली. "महाराज! हें मूल पुढें कसें निपजेल? तें कृपाकरून सांगा." असें ऐकून तो ह्मणा-

ला, "बाई! इतःपर असल्या ढोंगावर तुह्मीं विश्वास ठेवूं नका. हें थोतांड आहे. यांत कांहीं अर्थ नाहीं.' ते शब्द ऐकतांच त्या बाईला मोठें आश्चर्य वाटलें, कीं ज्या गृहस्थानें आजपर्यंत पुष्कळ वेळां अशा गोष्टी सांगितल्या, आणि लोकांपासून पुष्कळ द्रव्यहि हरण केलें, तोच गृहस्थ आज असें हें काय सांगतो! तेव्हां तिनें त्यास विचारिलें; "आजपर्यंत जें तुह्मीं सांगत आलां, तें सर्व खोटेंच?" तो ह्मणाला, "होय बाई यांत काय संशय?" पुनः ती ह्मणाली, "हें तुह्मीं कशा वरून सांगतां?" मग त्यानें आपल्या खिशांतून एक ख्रिस्ती धर्मशास्त्राचें पुस्तक काढिलें, आणि ह्मणाला "म्या ह्या पवित्रपुस्तकास गुरु केलें. यांत असें वचन आहे, कीं "जे लबाडी बोलतात, ते गंधक व अग्नि ईहींकरून प्रदीप्त झालेल्या डोहांत टाकले जातील.' यास्तव अशा प्रकारचें भविष्य सांगण्याबद्दल मी उपा सीं मरणें पत्करीन."

एक साधु असा उपदेश करितो—"अरे मनुष्या जर तुला मनुष्याची प्रीति आणि ईश्वराची कृपा संपा दन करायाची असली, तर सर्वकाळ सत्यच बोलत जा

" अन्यायोपार्जितं द्रव्यं दश वर्षाणि तिष्ठति "
" प्राप्ते एकादशे वर्षे समूलं च विनश्यति."

अर्थ—अन्यायानें मिळविलेलें द्रव्य फारच केलें तर दाहा वर्षेंपर्यंत राहातें; परंतु अकरावें वर्ष लागतांच तें सर्वस्वी जातें.

---

## प्रमाणिकपणाविषयीं उदाहरणें.

प्रमाणिकपणा आणि सत्य यांचा एकमेकांसीं एवढा संबंध जडलेला आहे, कीं त्यांतील एकाचें वर्णन करूं लागलें, ह्मणजे ओघानें दुसऱ्याचेंहि करावें लागतें. सत्य आणि प्रमाणिकपणा यांमध्यें जो अतिसूक्ष्म विचार आहे, त्याचीं उदाहरणें दाखविल्याशिवाय स्पष्टीकरण होत नाहीं.

या **भरतखंडांत हरिश्चंद्र** नामक एक मोठा प्रमाणिक राजा होऊन गेला; त्याची गोष्ट बहुधा सर्वांस माहितच असेल. ती असी, कीं तो मोठा धार्मिक, व प्रमाणिक पुरुष होता; त्यानें आपलें वचन पाळण्यासाठीं राज्याचा देखील त्याग करून शेवटीं आपणास विकूनहि घेतलें; तथापि प्रमाणिकपणा सोडिला नाहीं.

दुसरी एक गोष्ट ऐकण्यांत आली, तिचा सारांश
असा आहे, कीं **गुजराथेंत** कोणीएक मोठ्या ना-
मांकित सावकाराच्या पेढीवर एक विश्वासुक मुनिम
होता; ह्मणून त्या सावकाराचा त्याजवर पूर्ण विश्वास
बसला; यास्तव तो त्याला केवळ आपल्या भावाप्रमाणें
मानीत असे. कांहीं काळानें तो सावकार आजारी
पडून मरावयास टेंकला, त्या वेळीं त्याचा मुलगा सुमा-
रें पांच सहा वर्षांचा होता. तेव्हां त्यानें आपल्या
मुलाचें पालन करणारा ह्या भल्या मुनिमाशिवाय दु-
सरा कोणी सांपडणार नाहीं, असें पक्कें ध्यानां
आणून त्याच्या स्वाधीन तो मुलगा व दौलत केली
आणि इतकेंच सांगितलें, कीं " तुसीं कांहीं अधिक बो-
लत नाहीं; परंतु आजपर्यंत जसा लौकिक मिळवि-
लास, तसाच पुढेंहि मिळीव; ह्मणजे झालें." अ-
बोलून त्या सावकारानें प्राण सोडिला. पुढें तो मु-
निम तसेंच प्रमाणिकपणानें काम चालवीत असत
त्याचे कोणी आप्त येऊन असा बुद्धिभेद करूं लाग
कीं " भाऊ पाहा! हा एवढा कारभार तुझाकडे अस
तां लक्षावधि रुपये हातांत घोळतात, तर आतां आ-
पला तळीराम गार करून एकदम कां सुखी हो
नाहीं?" हें ऐकून घेऊन त्यानें त्यांस असें उत्त
केलें, कीं " छिः छिः, मजकडे असली दुराचरणाची



गोष्ट कधीं बोलूं नका. तुह्मी काय विश्वासघात क-
रून नरकाचें साधन करावयास सांगतां? म्या आ-
जपर्यंत ज्याचें अन्न खाल्लें, त्याच्या मुलास कसें ठ-
कवूं? हें निंद्य कर्म मी सहसा करणार नाहीं." पा-
हा! पुढें त्या मुनीमानें तो मुलगा वीस पंचवीस व-
र्षांचा होई तोंपर्यंत मोठ्या प्रमाणिकपणानें धन्याच्या
द्रव्याचें संरक्षण करून तें त्या मुलाच्या स्वाधीन
केलें.

**चीनदेशांतील** एका व्यापाऱ्याची गोष्ट वाचण्यांत
आली, कीं कोणीएक व्यापारी जो प्रमाणिकपणावि-
षयीं प्रसिद्ध होता, त्याचे घरीं एका दिवशीं शेजा-
रच्या गांवांतून कोणी व्यापारी आला; त्यानें त्याज-
वळ सुमारें दोन हजार रुपयांच्या चांदीचे गट अना-
मत ठेवून तो परत आपले गांवीं गेला; आणि एका-
एकीं कांहीं उपद्रव होऊन मरण पावला. पुढें तीन
वर्षेंपर्यंत त्या प्रमाणिक व्यापाऱ्यानें त्याची वाट पा-
हिली; परंतु त्याचा कांहींच शोध लागला नाहीं. ते-
व्हां त्याला मोठा विचार पडला; मग त्यानें त्या गृ-
हस्थाचा शोध लागावा ह्मणून आपल्या चाकरास त्या-
च्या गांवीं पाठवून त्याचा शोध लाविला; परंतु चाक-
रानें अशी खबर आणिली, कीं तो मरण पावला; आ-
णि घरीं त्याची बायको व पंध्रा सोळा वर्षांचा एक

मुलगा आहे. तें ऐकून त्यानें त्या मुलास पत्र पाठ
वून आपल्या घरीं आणविलें; आणि त्याला ते चां
दीचे गट देऊन सांगितलें, कीं "हें द्रव्य तुझें आहे,
घेऊन जा." असें ऐकतांच तो मुलगा घाबरून त्या
सावकाराच्या तोंडाकडे पाहत स्तब्ध राहिला; नंतर
त्यानें सर्व पूर्व वृत्तांत त्या मुलास सांगून तें द्रव्य त्या
च्या स्वाधीन केलें. पाहा! त्याचा प्रमाणिकपण
त्यास कसा फळास आला, कीं त्याचीं मुलें सद्गुण
आणि चतुर निघालीं. त्याच्या एका मुलास **चीन**मध्ये
मुख्य प्रधानाचीं वस्त्रें मिळालीं; आणि त्यानें तो कार
भार मोठ्या योग्यतेनें चालविला. हल्लींहि त्याचे नातू
पणतू **चीन** देशांत मोठीं मोठीं सरकारी हुद्याचीं का
करीत आहेत.

**रुशिआ देशांत पिटर्सबरो** ह्मणून एक शहर आ
त्याच्या जवळच्या गांवांत एक भली प्रमाणिक बा
राहत असे. तिला नातलग नव्हते, ह्मणून ती एक
टीच एका लहानशा झोंपडींत राहून शहरांत जाण्या
करितां जे व्यापारी लोक तेथें उतरत, त्यांनां जेव
करून घाली, आणि तेणेंकरून आपला चरितार्थ चा
लवी. एका दिवशीं डच देशांतील व्यापारी तारवांतू
जात असतां तिच्या घरीं उतरले. तिनें वहिवाटीप्र
माणें त्यांस जेवण करून घातलें. मग ते पहाटेस उठ



न तारवांत बसून चालते झाले. ते गेल्यावर कां-
हींका वेळानें त्या ह्मातारीला लाखमुद्रा केलेली अ-
सी होनांची थैली सांपडली. ती पाहतांच तिला मोठा
विस्मय होऊन असें वाटलें, कीं ही थैली त्या
व्यापाऱ्यांची असावी; परंतु काय करूं? तें तारूं दूर
गेलें असेल. मग त्या भल्या बाईनें ती थैली उच-
लून आपल्या पेटींत अशा हेतूनें ठेविली, कीं जर मा-
लक परत आला, तर ही त्याची त्यास परत द्यावी.
याप्रमाणें सात वर्षें गुजरलीं; परंतु कोणीच त्या थै-
लीचा शोध करावयास आला नाहीं. तिच्या दरिद्र-
पणामुळें कधीं कधीं तिला त्यांतून पैका काढून खर्च
करावासा वाटे; पण लागलाच ती विचार करून त्याचा
तिरस्कार करी. पुढें कांहीं दिवसांनीं तिघे इंग्लिश
आणि एक डच् असे चौघे व्यापारी तिच्या घरीं ये-
ऊन उतरले; आणि ओसरीवर गोष्टी करीत बसले
होते. इतक्यांत एका इंग्लिश व्यापाऱ्यानें त्या डच
व्यापाऱ्यास विचारिलें. "तुह्मी पूर्वीं कधीं हा गांव
पाहिला होता?" "होय; ह्या गांवाची मला पक्की
माहिती आहे, ती मी कधींहि विसरणार नाहीं. का-
रण, ह्याच गांवांत माझी सातशें होनांची थैली गेली."
"काय ह्मणतां? हें कसें झालें?" असें त्याच्या सो-
बत्यानें विचारिलें. तेव्हां तो सांगूं लागला, कीं "कां-

हीं वर्षीमागें ह्या गांवांत अशा एका बाईच्या घरीं
उतरलों होतों, त्या वेळीं म्या थोडासा अम्मलहि केला
होता; अशा संधींत ती थैली कोठें गेली, त्याचा थांग
अद्यापि लागला नाहीं." तें ऐकून ती ह्मातारी ह्मणा
ली "त्या पिशवीवर तुमची कांहीं खुण होती काय?"
तेव्हां त्यानें उत्तर केलें, "होय बाई! तिच्या तोंडा
वर लाख बसवून ह्या घड्याळाच्या सांखळींतील मो
तंबेचा शिक्का केलेला होता." मग ती बाई सांगि
तलेली खूण ओळखून समजली, कीं ती थैली या
गृहस्थाची असावी. असा विचार करून ह्मणाली,
"ठीक आहे. कदाचित् थैली सांपडेल." "काय
ती आतां सांपडेल? मी तर घेण्यासाठीं तयार आहे
परंतु या जगामध्यें एवढा प्रमाणिकपणा कोठें आहे
कीं जी थैली गेल्यास आज सात वर्षें झालीं, ती कोण
आणून देईल? स्मरण झालें ह्मणजे माझ्या मनास
उद्विग्नता येऊन मोठा खेद होतो. ह्या गोष्टीचें स्मरण
झालें नसतें, तर बरें होतें. राहूंद्या ती गोष्ट, दुसरें
कांहीं तरीं बोला." असे खेदाचे शब्द ऐकतांच ती
ह्मातारी आपल्या खोलींत जाऊन थैली घेऊन बाहेर
आली, आणि बोलली, "दादा पाहा! प्रमाणिकपणा
दुनयेंतून बुडाला, असें तुह्माला वाटत होतें तर ती
आहेच; असी तुमची आतां खात्री होईल." असें



बोलून ती थैली त्याच्या समोर आणून ठेविली. ती पाहतांच धन्याला तर फारच हर्ष झाला. मग त्याने ती पिशवी सोडून तींतून एक होन घेऊन त्या बाईच्या प्रमाणिकपणाविषयीं मोठी प्रशंसा करून तो तिच्या हातावर ठेविला. तें पाहतांच ते तिघे इंग्लिश व्यापारी चकित होऊन तिच्या स्तुत्य प्रमाणिकपणास हा फार थोडी देणगी देतो, ह्मणून त्याला धिःकारून बोलले. "काय तुला हें योग्य आहे?" तेव्हां ती ह्मातारी ह्मणाली, "यांतून मला एक पैसाहि नको. जें मनुष्यपणास उचित तेंच म्या केलें. यांत मला इनाम देण्याचें काय कारण? तुह्मी आपला होन परत घ्या." परंतु त्या इंग्लिश व्यापाऱ्यांनीं तें न कबूल करूं देतां त्यांतून एक ह्मणायास लागला, "आह्मी जवळ असतानां असी हलकी देणगी देऊं देणार नाहीं. अहो! या प्रसंगीं ह्या बाईने असें वर्णनीय कर्म केलें असतां तिला योग्य बक्षीस असावें." मग त्यांचा अतिशय आग्रह पाहून त्याने शंभर होन त्या बाईस मोठ्या आग्रहानें दिल्हे. आणि चालता झाला. पाहा! ती थैली त्या बाईनें जर दडवून ठेविली असती तर तिला ती पचली असती. ती सांपडली, हेंहि कोणास ठाऊक नव्हतें. अथवा तिजवर कोणी चोरीचाहि वहमा आणिला नसता; परंतु

प्रमाणिकपणामुळें तिच्यानें ती थैली ठेववली नाहीं
कारण, दुसऱ्याच्या अपहार केलेल्या द्रव्यापासून को
णास सुख होत नाहीं. ह्या तिच्या प्रमाणिकपणापासू
किती आनंदकारक परिणाम घडला तो पाहा! त्य
विचाऱ्यास जें पैशाचें दुःख झालें होतें, तें निवारण
झालें आणि ह्मातारी दरिद्रविच्छिन्न होऊन लोकांत सु
कीर्ति पावली. जर तिच्या अंगीं एवढा प्रमाणिकपणा
नसता, तर तिचें नांव ह्या भरतखंडांत कसें प्रसिद्ध
झालें असतें? एका प्रमाणिकपणानेच तिचें नांव केवळ
अमर होऊन गेलें.

कोणीएका प्रमाणिक राजानें आपल्या राज्यांत अ
सा कायदा केला होता, कीं जर कोणाच्या अंगीं व्य
भिचाराचा दोष लागू झाला, तर त्याचे दोन्हीं डोळे
काढावे. पुढें कांहीं दिवसांनीं दैववशात् असी गोष्ट घ
डून आली, कीं त्याच्याच एकुलत्या पुत्राच्या अंगीं तो
दोष शाबीत झाला असतां त्याचे दोन्हींहि डोळे काढा
वे, असें ठरलें. त्या वेळीं राजाच्या अंतःकरणांत दया
उत्पन्न होऊन तो मोठ्या काळजींत पडला, आणि
विचार केला, कीं जर पुत्राचे दोन्हीं डोळे काढावे
तर त्याला हें शासन मरणप्राय होईल. बरें, जर
काढावे, तर मजवर अप्रमाणिकपणाचा दोष येऊन
त्यामुळें सर्व रयतेंत असत्याचीच प्रवृत्ति होईल. या

प्रमाणें राजा मोठा विचारांत पडला असतां त्याने असी युक्ति केली, कीं आपल्या पुत्राचा एक डोळा आणि आपला येक डोळा असे दोघांचे मिळून दोन डोळे काढविले. ह्या वर्तणुकीवरून त्या राजाची कीर्त्ति दिगांतरीं गेली.

इंग्लंडदेशांतील एका लहान गांवांत एक गरीब प्रमाणिक ख्रिस्ती उपदेशक राहत असे. तो एका दिवसीं सकाळीं बाहेर शेतांत फिरावयास गेला असतां त्याच्या पायास एक द्रव्याची थैली लागली. ती घेऊन त्याने तिच्या धन्याचा शोध केला; परंतु कोणी सांपडला नाहीं. मग त्याने ती थैली घरीं आणून बायकोच्या स्वाधीन केली. त्या वेळेस ती ह्मणाली, " यांतून थोडेंसें द्रव्य काढून आपल्या मुलाबाळांचें कांहीं दुःख दूर करूं " तेव्हां त्याने तिला स्पष्ट सांगितलें, कीं " इच्या धन्याचा पक्का शोध केल्यावांचून मी यांतील द्रव्यास शिवणार नाहीं. अगे ? तुला माहित आहे, कीं प्रमाणिकपणा हाच थोरपणा आहे. " नंतर कांहीं दिवसानी त्या द्रव्याच्या धन्याचा शोध लावल्यावरून त्याने ती थैली त्याच्या स्वाधीन केली. ती घेऊन तो त्याचे मोठे आभार मानून चालता झाला. त्या समयीं त्याचे हे शुष्क आभार व कृतघ्नता पाहून त्या गृहस्थाच्या बायकोस राग आला; आणि आ-

पल्या नवऱ्याच्या प्रमाणिकपणाविषयीं त्यास छळं लागली; तें ऐकून पुनः तो तसेंच ह्मणाला, " अगे! तूं ध्यानांत धर, कीं प्रमाणिकपणा हाच थोरपणा. पुढें कांहीं दिवसांनंतर त्या थैलीच्या धन्यानें त्या प्रमाणिक उपदेशकाला जेवायास बोलावून सालीना तीन हजार रुपये उत्पन्न होतील असें एक ठिकाण, व रोख पांच शें रुपये, असे दिल्हे. ते तो मोठ्या आभाराने घेऊन घरीं आला; आणि आपल्या बायकोस ह्मणूं लागला; " अगे प्रिये, आतां तरीं तूं प्रमाणिकपणा हाच थोरपणा असें कबूल करसीलना?"

रुशिआ देशांतील **पीटर दी ग्रेट** बादशाहाच्या कारकिर्दींत एक धर्माध्यक्षाची जागा खाली झाली तेव्हां मुख्य प्रधानाने बादशाहास जाऊन सांगितलें, कीं " शहरांत कोणी चांगले विद्वान सांपडत नाहींत." त्या वेळीं बादशाहानें उत्तर केलें, कीं " चिंता नाहीं; कोणी भला प्रमाणिक पाहून त्यास ती जागा द्यावी. तुला ठाऊक आहे ! एक प्रमाणिक मनुष्याची योग्यता दोघां विद्वानांपेक्षांहि अधिक आहे."

**नसीरवान्** नामें इराणदेशाचा बादशाहा एका दिवशीं शिकारीस गेला असतां त्याने कांहीं सावजें मारिलीं. तेव्हां भूक लागल्यामुळें त्याला असें वाटलें, कीं कांहीं मांस शिजवून खावें. त्या वेळीं मिठावां

चून सर्व तयारी असतां दोघे हुजरे बादशाहास न-कळतां शेजारच्या गांवीं जाऊन मोल दिल्याशिवाय थोडें मीठ घेऊन आले. हें बादशाहाला समजतांच त्याने त्या हुजऱ्यांस बोलावून सांगितलें, कीं "ही गोष्ट तुह्मी फार वाईट केली. तर आतां लागलेंच प-रत जाऊन त्या मिठाच्या धन्यास किंमत देऊन या." आणि त्यांस ह्मणाला, "पाहा! ही गोष्ट किती अ-योग्य आहे, कीं जर आपण लहानशा वस्तूकरितां प्रमाणिकपणा ठेविला नाहीं. तर लोकांस न्याय आ-णि अन्याय कसा समजेल?" याविषयीं असी ह्मण आहे, कीं "यथा राजा तथा प्रजा."

फ्रान्स् देशांत एक कुटुंबवत्सल गरीब प्रमाणिक ह्मातारी राहत असे. तिचा कोणी एक भला गृहस्थ मित्र होता, तो दूरदेशीं जावयास निघाला तेव्हां त्याने आपल्याजवळील सुमारें दोन तीन हजार रु-पयांचा ऐवज तिच्या स्वाधीन केला, आणि सांगित-लें, कीं "जर तुला गरज लागली, तर यांतून लागेल तितक्या द्रव्याचा खर्च कर; आणि मला कांहीं संत-ति न होतां जर मी मरण पावलों, तर हें द्रव्य तुझें-च, असें समजून त्याचा व्यय कर." असें सांगून तो गृहस्थ गेला. नंतर कधीं कधीं तिला कांहीं अडचण पडे; तरीं तिने त्या द्रव्यास स्पर्श न करितां तें नीट

जतन करून ठेविलें. ती त्या गृहस्थाचें वारंवार स्मरण करून ह्मणे, कीं तो आपलें द्रव्य घेऊन जाता तर बरें होतें; परंतु पांच सहा वर्षें लोटलीं तथापि त्याचा कांहीं थांग लागला नाहीं. मग कांहीं काळाने तो मेला असें समजलें; तेव्हां तिला फार वाईट वाटून त्याच्या द्रव्याचें काय करावें, असी धास्ती धरून ह्मणाली; बरें, जर त्या गृहस्थाला कोणी बायको पोर नसेल, तर कदाचित् त्यास कर्जदार असतील. यास्तव आपण त्याचें द्रव्य खर्चूं नये. असें ह्मणून ती त्याच्या शोधास लागली. नंतर तिला असा पत्ता लागला, कीं **प्रशिआ** देशांत त्या गृहस्थाची बायको मुलें आहेत. असें ऐकतांच त्यांस पत्र पाठवून असें कळविलें, कीं मजपासीं तुमचें द्रव्य आहे. तेव्हां त्यांस मोठा हर्ष झाला, कारण, तीं कांहीं लाचारींतहि होतीं, आणि ह्या द्रव्याविषयीं त्यांस कांहीं माहितीहि नव्हती. पुढें तीं तेथें आलीं असतां त्या ह्मातारीनें तें सर्व द्रव्य त्यांच्या स्वाधीन केलें. तेव्हां त्या गृहस्थाच्या बायकोने त्या बाईला त्यांतून कांहीं द्रव्य द्यावयास काढिलें; परंतु तें तिने घेतलें नाहीं. आणि स्पष्ट सांगितलें, " कीं ह्यांतून मी एक कवडीहि घेणार नाहीं. मला इतकेंच पाहिजे, कीं माझा प्रिय मित्र जो तुझा नवरा त्याच्या कुटुंबांत माझें नां-

व असावें. ज्याचें द्रव्य त्याच्या स्वाधीन झालें, इतक्यांतच मी संतुष्ट आहें."

सन १७७६ रांत **लिस्बन** शहरांत असी गोष्ट वडली, कीं एक गरीब म्हातारी पुष्कळ दिवस एकसारिखी राजाच्या दरबारांत जाई; परंतु शिपाई लोक तिला पाहतांच हांकून देत; म्हणून तिची व राजाची कधीं गांठ पडेना. एका दिवशीं राजाची स्वारी बाहेर निघाली असतां तिने त्याला रस्त्यांत गांठिलें; आणि हाक मारून म्हणाली, कीं " महाराज ! मज गरीबाकडे पाहून माझी विनंती ऐका. सन १७७५ रांत एथें धरणीकंप झाला, त्या वेळीं मोठमोठ्या हवेल्या पडल्या, त्यांतील एका हवेलींत मला द्रव्याची चर्वी सांपडली. मी गरीब भिकारीण असून मला चार मुलें आहेत; परंतु ह्या द्रव्यास स्पर्श करण्याची माझी इच्छा नाहीं. ह्यापासून माझें दरिद्र जाईल, यांत संशय नाहीं. परद्रव्य घेणें यापेक्षां भीक मागून पोट भरणें हें मला बरें वाटतें. यास्तव हें आपण कृपाकरून घ्या; आणि शोध करून जो मालक ठरेल, त्यास पावतें करा." असें तिचें भाषण ऐकतांच राजानें उभें राहून पाहिलें, तों ती चर्वी जवाहिरानें भरलेली आहे. तेव्हां त्याने त्या बाईच्या प्रमाणिकपणा-

विषयीं मोठी तारिफ करून तिला एक लहानसा गांव इनाम दिल्हा. मग त्या जवाहिराच्या धन्याचा शोध केला असतां कोणी मालक न सांपडल्यामुळें तें विकून त्याचें उत्पन्न त्या बाईसच देवविलें. पाहा! एका प्रमाणिकपणाने त्या म्हातारीचें आणि तिच्या मुलांबाळांचें किती कल्याण झालें!

**आलिवर क्रामवेल्** नामें एका संभावित गृहस्थाची सुमारें सात वर्षांच्या वयाची नात होती. तिच्या प्रमाणिकपणाविषयीं ही पुढील गोष्ट वाचण्यांत आली. **क्रामवेल्** ह्या मुलीस आपणाबरोबर बहुत करून बाहेर फिरायास नेत असे. तो जेव्हां सरकारी कामावर जाई, तेव्हांहि ही मुलगी त्याजबराबर बहुधा जाऊन सभेंत बसत असे. एके वेळीं राज्यप्रकरणीं कांहीं नाजूक कामाविषयीं **क्रामवेल्** आणि दुसरे तिघे गृहस्थ मसलत करीत बसले असतां एकास ह्या मुलीविषयीं संशय येऊन तो ह्मणाला, "इला येथून बाहेर बसविलें तर बरें." त्या वेळीं **क्रामवेल्** ह्मणाला, "हिच्या प्रमाणिकपणावर माझा एवढा भरंवसा आहे, कीं ह्या मुलीपासीं सांगूं नये, असी कोणतीहि गुह्य गोष्ट मी ठेवीत नाहीं. जसा मला तुमच्या प्रमाणिकपणाचा विश्वास आहे, तसाच तिचाहि आहे; तिजविषयीं तुह्मी काडीमात्रहि अंदेशा

घेऊं नका." तें ऐकून ते उगीच राहिले. मग एक दोन दिवसांनी ह्या मुलीची परीक्षा पाहावी, ह्मणून तिच्या आईकडून तिला कांहीं खाण्याचा पदार्थ व खेळायाच्या वस्तू देण्याची भुलथाप देऊन विचारविलें, कीं परवांच्या दिवसीं तूं सभेंत गेली होतीस, तेथें काय मसलत होत होती, ती मला सांग. परंतु तिने ती सांगितली नाहीं. याविषयीं आईनें व घरांतील दुसऱ्या मनुष्यांनीहि तिचें बहुत आर्जव केले; तथापि ती मुलगी मसलतीपैकीं ब्र देखील बोलली नाहीं. शेवटीं ती मसलत सांगावी ह्मणून तिला मारायाचेंहि भय दाखविलें तरीं तिने तो बेत सिद्धीस जाऊं दिल्हा नाहीं.

---

## असत्याचे प्रकार.

सत्याचा अंगीकार केला असें दाखवून तें उल्लंघन करण्याचे प्रकार अनेक आहेत. ते असे, कीं तोंडांतून लबाडी बोलल्यावांचून ठकवायाचें असलें, तर हरयुक्तीने दुसऱ्यास ठकवितां येतें. पाहा! बाजारांत कापड विकणारे लोक आपल्या दुकानासमोर कापडाचे पडदे बांधून चहूंकडे अंधार करितात. अशा-

साठीं, कीं आपला माल वाईट असला, तरीं तो गि-ऱ्हाइकास बरा दिसावा; आणि त्याप्रमाणें त्याची किम्मत यावी. तसेच दुसरे व्यापारी कांहीं जिनसा जुन्या असल्या, तरीं त्या ठिकठाक करून नव्यासारिख्या बनावितात. तसाच कांहीं वाईट माल चांगल्या मालांत मिश्रित करून भुलथापीने त्याची किम्मत अधिक घेतात. अशा नाना प्रकारच्या युक्तीने व्यापारी लोक तोंडांतून असत्य बोलल्यावांचून दुसऱ्यास फसवितात; आणि मनांत असें समजतात, कीं आपण कांहीं लबाडी केली नाहीं. यास्तव असत्याचा दोष ईश्वर आह्मास लावणार नाहीं. असी विपरीत समजूत घेऊन स्वस्थ असतात; परंतु त्यानी मनांत पक्कें समजावें, कीं लबाडी कोणत्याहि प्रकारें केली, तरीं ती ईश्वराच्या दृष्टीसमोर सारखीच आहे. त्याच्या समोरून कांहींच लपलें जात नाहीं; कारण तो सर्वव्यापक आहे. कांहीं कर्म एकांतीं केलें, तरीं तें तो पाहतो; त्याला मध्यरात्रीसारिख्या काळोखांत दिवसाच्या भर दोनप्रहरांसारिखें दिसतें. अधिक तर काय सांगावें, आपल्या अंतःकरणांतील सर्व भाव देखील तो जाणतो. अशा सर्वज्ञ ईश्वरापासून असत्य लपवायास आपल्याला कोठें जागा सांपडेल बरें! जरीं कोणी ह्याप्रमाणें वर्त्तणूक ठेऊन बाहेरून अ-

सत्य दाखवीत नाहीं, तरी त्यास प्रमाणिक ह्मणावें काय? तसेंच खोटीं मापें व वजनें करून दुसऱ्यास ठकविणें, हेंहि मोठें दोषास कारण होय. याविषयीं धर्मशास्त्रांत असें लिहिलें आहे. "खोट्या वजनांचा ईश्वर तिरस्कार करितो." पाहा, यांकडून किती दगा होतो! एखाद्या गृहस्थापासून धान्याची बरोबर किम्मत घेऊन मापांच्या दगलबाजीने त्याच्या हातीं अर्धोअर्ध देणें, किंवा एखादा वाटसरू आपल्या वाटखर्चाकरितां अशा दुष्टाकडून कांहीं दाणा घेऊन प्रवासास दूर गेला, तर मार्गांत एकाएकीं त्याची बेगमी खुटल्यामुळें त्याची अवस्था कसी होईल? तसेंच एखाद्या गरिबाचीं पांच सहा मुलें खाणारीं असलीं, आणि त्याचा या प्रकारें दगा झाला, तर किती अनर्थ होईल बरें? त्याच्या पोरांस पोटभर खावयास न मिळाल्यामुळें कदाचित् तीं दुराचरणांत पडून चोरी करूं लागतील; मग त्या पातकाचा कोण विभागी होईल?

एखादा व्यापारी प्रमाणिकपणाने व्यापार करूं लागेल, आणि तो जर योग्य रीतीने नफा घेईल, व दुकानावर एखादा गैरमाहित किंवा लहान मुलगाहि कांहीं जिन्नस विकत घ्यावयास आला, तरीं त्याजपासून कधीं जास्ती किम्मत घेणार नाहीं, तर

त्याची लोकांत ख्याति होऊन दुसऱ्या दुकानदारांपेक्षां त्याच्या दुकानावर अधिक विकरी होऊं लागेल, यांत कांहीं संशय नाहीं. आणखी तो दुसऱ्यांपेक्षां अधिक द्रव्यहि कमावील; आणि अशा रीतीनें संपादन केलेलें द्रव्य चिरकाल राहील.

काशीमध्यें एक तुप विकणारा वाणी आहे तो प्रमाणिक असून सधन आहे असें सांगतात. त्याच्या दुकानावर कोणी भावाविषयीं व वजनाविषयीं खटपट करीत बसत नाहींत. त्याच्या स्वाधीन भांडें आणि पैसे करितात ह्मणजे तो चांगलें साजुक तुप त्यांत घालून त्यांच्या स्वाधीन करितो.

कोणी एका सत्यशील व्यापाऱ्याविषयीं एक गृहस्थ असें ह्मणतो, कीं "त्याचा धर्म कोणता, आणि तो कोण, याविषयीं म्या आजपर्यंत कांहींच विचार केला नाहीं, परंतु मी एवढेंच जाणतों, कीं त्या व्यापाऱ्यासारिखा प्रमाणिक आणि भला असा कोणीहि मला आढळला नाहीं. दुसऱ्याकडून खत लिहून घेऊन पांच रुपये देण्याबद्दल मी त्याच्या शब्दावर त्याला दाहा हजार रुपये देखील देईन. ह्या भल्या व्यापाऱ्याचा असा स्तुत्य गुण आहे, कीं तो आपल्या वचनांस किमपि अंतर पडूं देत नाहीं.

एखाद्याची असी समजूत असती, कीं दुसऱ्यास ठकवून किती जरी नफा घेतला, तरीं तें पातक नाहीं; आणि कदाचित् त्यापासून कांहीं पातक लागलें तर तें धर्म केल्यानें किंवा प्रायश्चित्त घेतल्यानें सहजच जाईल. अशा खोट्या समजुती घेऊन लोक असत्य भाषणामुळें आपला नाश करून घेतात. ईश्वरानें जी आज्ञा दिल्ही ती जर आपण बुद्ध्या मोडली, आणि त्याची भलत्याच रीतीनें समजूत करीन झटलें, तर तें कसें होईल ? पाहा ! नीतिमान् राजाचा हुकूम चौघांत मोडला, आणि एकांतीं जाऊन त्यास मोठा नजराणा दिल्हा, तर तो संतुष्ट होईल काय ?

सत्य मोडण्याचा दुसरा प्रकार—आपण दुसऱ्याचें कांहीं काम अमुक मुदतीनें करूं असें कबूल केलें, आणि आपल्या अंगीं शक्ति असून तें न करणें; तसेंच कोणाची चाकरी पत्करून दरमाहा घेत असतां त्या कामांत आळस करणें; किंवा संधि सांपडल्यास तें काम सोडून लोभामुळें दुसऱ्याचें पत्करणें; हीहि एक लबाडीच होय. सरकारी अथवा कोणताहि अधिकार प्राप्त झाला असतां त्या कामावर नेमलेल्या वेळेस हजीर न होतां आपण हजीर होतों असा डौल घालणें; तसेंच आपल्या हाताखालचे लोक काम

बरोबर करितात किंवा नाहीं, याचा शोध न ठेवणें; अथवा कोणी कांहीं वस्तु विकत आणायास पैसे दिले असतां त्या वस्तूस जी वास्तविक किम्मत पडली असेल, तिजपेक्षां अधिक घेणें; किंवा त्या जिनसेंतून थोडीशी काढून ठेवणें; अथवा दुसऱ्याच्या वस्तूचा सांगितल्यावांचून आपण कांहीं वेळ उपभोग घेणें; हेहि लबाडीचेच मार्ग आहेत.

सरकारी कागद लेखण्या वगैरे कांहीं सामान आपल्या कामास लावून तें सरकारी कामासच खपलें असें सांगणें. यांत दोन तऱ्हेचे दोष लागू होतात; एक चोरी आणि दुसरी लबाडी. असेंच एखादा रोजगार मिळवायासाठीं कोणी श्रम करीत असतां त्याजपासीं इष्टत्व धरलेंसें दाखवून युक्तिप्रयुक्तीनें त्या कामाचा सर्व शोध काढून त्यानें जसे प्रयत्न केले, तसे त्यास न कळतां आपण करून त्या बिचाऱ्यास जो लाभ होणार, तो आपण प्राप्त करून घेणें; हाहि एक विश्वासघातच होय.

आपणास कांहीं काम असल्यामुळें आपल्या धन्यास किंवा गुरूस प्रकृति बिघडल्याचें निमित्त घडवडीत लिहून पाठविणें, हें किती दुराचरण आहे! पाहा! ज्या ईश्वरानें आपणास जन्मास घातलें त्याचे आपण केवढे अपराधी होतों, याचा विचार करा

त्यानें निरोगी ठेविलें असतां मला ज्वर आला; किंवा पोटांत दुखतें, असें जर आपण धन्यास लिहिलें, तर ईश्वरीकोप झाल्यावांचून कसा राहील? व्यवहार-रीतींत तरी पाहा. जर एखाद्यानें चांगली मेजवानी करून तुह्मास मिष्टान्न घातलें असतां तुह्मी शेजाऱ्याचे घरीं जाऊन मला त्या गृहस्थानें उपासीं दवडिलें; असें सांगितलें, तर त्या गृहस्थास किती संताप येईल! याचप्रमाणें आपली लबाडी धन्यास समजली असतां त्यास किती राग यावा बरें? येणेंकरून आपल्या पदरीं किती अप्रमाणिकपणा येतो, याचा विचार करा.

आपण गरीब असतां श्रीमंत आहों, असा डौल घालणें; किंवा प्रमादामुळें व उतावळीमुळें अथवा दुसऱ्या कोणत्याहि अडचणीमुळें असत्य बोलणें, ह्याहि लबाड्याच आहेत, तर याविषयीं फार सावधगिरी ठेवून त्याचा त्याग करावा. जरी असल्या लबाड्यानी दुसऱ्याचा नाश होत नाहीं, तरी तो अवगुणच असें समजावें. त्यापासून अगदींच नीचपणा येतो. पहा, आपली योग्यता कमी असून मोठेपणा मिरविणें, यांत किती फजिती व उपहास आहे!

जो शिक्षागुरु आपणास एखादा विषय चांगला समजत नसतां मला ठाऊक आहे, असा डौल घालून

आपल्या शिष्यास भलताच खोटा अर्थ सांगतो, आणि आपला पक्ष खोटा असें समजलें असतांहि त्याचें प्रतिपादन करितो, तोहि अप्रमाणिक असें समजावें. अशा कर्तृत्वानें शिष्याच्या विद्येंत मोठा विपर्यास पडून त्याची बुद्धिहि बिघडती.

केवळ माल विकणाराकडूनच लबाडी होती, आणि घेणाराकडून होत नाहीं, असें नाहीं. पाहा! कोणी एखादा कांहीं जिन्नस घ्यावयास लागला, आणि जी जिन्नस घ्यावयाची ती चांगली आहे, व तिजसाठीं बाजारांत किम्मत अधिक पडती, असें माहित असतां मालकास असें दाखवितो, कीं ती बरी नाहीं, व तिचा भावहि बाजारांत कमी आहे. असें सांगून जी त्याला वास्तविक किम्मत देणें ती न देतां त्यास ठकवून स्वस्त मोलानें घेतो; तर तोहि लबाडच समजावा.

कांहीं जिन्नस चोरीची असें समजलें असतांहि ती स्वस्त मिळती, असें पाहून जो घेतो तोहि लबाड असें समजावें. त्याच्याकडे दोन अपराध लागू होतात चोरी आणि लबाडी. चोरीची जिन्नस घेणारा ज्या मालास अधिक मोल पडतें, असें समजलें असतां तो माल केवळ हलक्या मोलानें घेऊन दुसऱ्यास ठकवितो, आणि चोरी उघडकीस न यावी ह्मणून

प्रयत्न करितो. तर ही केवढी लबाडी आहे! एखाद्याची चोरी झाली, तर तिचा शोध लावायास सर्वांनीं झटावें असा मनुष्याचा धर्म आहे; तसें न करितां जो ती छपवावयास पाहतो, तो किती दोषी! हें सहजच लक्षांत येतें.

एखादा चाकर मेहनत घेऊन इमानें इतबारें चाकरी करीत असतां जो धनी त्याचे श्रम तुच्छ मानितो, तो लबाड समजावा. जर एखाद्याने कांहीं उद्योग चांगला केला, तर त्यास योग्यतेप्रमाणें थोरपणा अथवा बक्षीस द्यावें, तें न देतां जो उलटी त्याची निंदा करितो, तो लबाडच. पाहा! मनुष्याची बुद्धि किती कृपण आहे! स्वतः थोडेसे श्रम केले, तर असें इच्छितो, कीं आपल्यास पुष्कळ मान व द्रव्य मिळावें; परंतु तेच श्रम दुसऱ्याचे असले, ह्मणजे कसपटाप्रमाणें मानितो.

दुसऱ्याच्या ग्रंथांतून कांहीं विषय उतरून घेऊन तो म्याच लिहिला असें दाखविणें, ही एक लबाडीच आहे. त्यामध्यें किती हलकेपणा व अपकीर्ति आहे! ज्याच्या ग्रंथांतून उतरून घेतला, त्याच्या दृष्टीस ती लबाडी आली, ह्मणजे त्याला किती वाईट वाटत असेल बरें! असें केल्याने बुद्धीचाहि प्रसर होत नाहीं.

एखादा मोठा रोजगार प्राप्त झाला असतां लोभांध होऊन लांच घेतो, तो मोठा अपराधी असें समजावें. तसाच जो दुसऱ्याला लांच देतो, तोहि लबाडच. जो लांच घेतो, तो विश्वासघात करून सरकारचें नुकसान करितो, व आपल्या आब्रूचीहि नासाडी करून टाकितो. लांच घेण्याचें कारण हेंच, कीं खऱ्याचें खोटें करणें. बहुधा वाजवी न्याय असला, तर कोणी कोणास लांच कबूल करीत नाहींत. आतां लांच देणारा किती दोषी आहे, ह्याचा विचार करून पाहा. एखादा लांच घेणारा धीट मनाचा नसला, आणि त्याच्या घरीं लांच देणारा घडीघडी खेपा घालून पुष्कळ द्रव्याची भुलथाप देऊं लागला, ह्मणजे आशा उत्पन्न होऊन द्रव्य घ्यावेंसें वाटतें. जर मुळींच लांच देणारा कोणी नसला, तर घेणाराचें अंत:करण बिघडणार नाहीं.

थोडें द्रव्य मिळत असतां जो दुसऱ्याचें कर्ज काढून उडवितो, आणि पुढें कर्जदारांला देण्यास कांहीं नाहीं, ह्मणून नादारीची अर्जी घेऊन सुटका करून घेतो, तोहि मोठा लबाड असें समजावें. पाहा! ही केवढी लबाडी आहे, कीं दुसऱ्याचें घेतलेलें कर्ज देण्यास शक्ति नाहीं, असें समजत असतांहि तें काढून निर्भयपणें उधळावें; मग मी गरीब, मजजवळ कांहीं

नाहीं, असें सांगून दुसऱ्यास बुडवावें, हें किती वाईट काम आहे ! कोणी कोणी असें करितात, कीं गांठीस कांहीं द्रव्य ठेवून तें आपल्या मुलांबाळांच्या नांवावर चढवितात, आणि आपण नादार असें दाखवून आह्मापासीं कांहीं नाहीं, अशी खोटी शपथ घेतात; तर असें जे करणारे तेहि मोठे लबाड, विश्वासघातकी, असें समजावें.

उघड असत्य बोलण्याचे प्रकार—कांहीं एक मालाच्या वास्तविक किमतीपेक्षां घेणारांस दुप्पट तिप्पट सांगणें; एखादें काम करितों, असें कबूल करून तें न करणें; कोणतीहि गोष्ट पाहिली किंवा ऐकिली असतां तींत अधिक उणें करून सांगणें; व आपल्यास जी मिळकत तींत न्यूनाधिक करून सांगणें; तसेंच आपण घरांत असतां घरच्या मनुष्याकडून घरांत नाहीं, असें सांगविणें; अणखी कोणी प्रवासी मार्ग चालत असतां पुढचा गांव किती दूर आहे ? असें त्याने विच्यारल्यावरून त्याला, तो गांव दूर असल्यास जवळ आहे, ह्मणून सांगणें, इत्यादि.

कित्येकांचें असें मत आहे, कीं जेणेंकरून दुसऱ्याची हानि होत नाहीं, असी लबाडी केली असतां तिचा दोष लागत नाहीं; व दुसरे असें ह्मणतात, कीं जर एखाद्याचा जीव वांचतो, व जेथें गरिबाचें कल्याण

होतें, तेथें मनांत कांहीं अंदेशा न आणतां लबाडी केल्यास चिंता नाहीं. परंतु वास्तविक पाहिलें असतां हे दोन्ही प्रकार बाधक आहेत. कोणत्याहि प्रसंगीं असत्य बोललें असतां तें ईश्वरापासीं रुजू होणारच नाहीं. मोठी लबाडी तर असो; परंतु लहानसहान लबाड्यांपासून किती अनर्थ होतात ते पाहा. आपण घरांत असून चाकर व कुटुंबांतील माणसें यांजकडून घरीं नाहीं असें सांगितलें असतां जो भेटायास येतो, त्याच्या आशेची निराशा होती. दुसरें, चाकरास असत्याचा अनुग्रह केल्याचा दोष आपणावर येतो. अणखी, त्याला एकवेळ लबाडी बोलायास सांगितली, ह्मणजे तो आपणास ठकवूं लागतो; तसेंच कुटुंबांतील मुलें माणसें आपलें पाहून असत्य बोलायास शिकतात; मग एकदां तीं अल्प गोष्टीविषयीं असत्य बोलूं लागलीं, ह्मणजे सवई पडल्यामुळें मोठमोठीं साहसें करण्याच्या मार्गींत शिरतात. त्या काळीं त्यांस सत्याचा आणि असत्याचा भेद समजत नाहींसा होतो. पाहा! एक असत्याचें प्रतिपादन करण्यास हजारों तऱ्हेच्या लबाड्या करितात; समयविशेषीं त्या खऱ्या करण्यासाठीं चोरीहि करण्यास चुकत नाहींत.

संग्रहालय.

इंग्लंड देशांत कोणी एक सात्विक गृहस्थ राहत असे. तो एका दिवसीं बाहेर गेला असतां त्याने आपल्या मुलांस सांगितलें; कीं माझ्या लिहिण्याच्या कोठडींत कोणी जाऊं नये, असें असतां त्याचा एक मुलगा बाप बाहेर गेल्यावर हळूच त्या कोठडीचें दार उघडून आंत गेला; आणि हातांत एक चित्रांचें पुस्तक घेऊन चित्रें पाहत एके खिडकींत बसला. इतक्यांत मोठा वाऱ्याचा झपाटा येऊन त्यांतून बापाने ठेवलेला उपयोगी कागद उडून गेला. असें झाल्यावर तो मुलगा घाबरून तें पुस्तक जिकडचे तिकडे ठेवून खोलीबाहेर आला. मग कांहीं वेळाने बाप घरीं आला, आणि खोलींत जाऊन पाहतो, तों पुस्तकांत तो कागद नाहीं. तेव्हां त्याने सर्व मुलांस बोलावून प्रत्येकास त्याविषयीं विचारिलें; परंतु त्या सर्वांनीं आह्मास ठाऊक नाहीं, असें स्पष्ट सांगितलें. हें पाहून त्या गृहस्थास दोन दुःखें झालीं; एक तर उपयोगी कागद गेला. दुसरें, आपल्या मुलांत कोणी तरी लबाड आहे; अशा दुःखामुळें तो त्या कागदाचा फारच शोध करूं लागला. आतां पाहा! ज्या मुलाकडून हें कृत्य घडलें होतें, त्याने देखील धडधडीत आपल्या बापास सांगितलें, कीं ही गोष्ट मला बिलकूल ठाऊक नाहीं. दुसरे दिवसीं शेजारचा

एक मुलगा ज्यानें त्याचें हें कृत्य पाहिलें होतें, त्यानें त्या मुलग्यास एकीकडे नेऊन दटावून सांगितलें, कीं " अरे! काल तूं खिडकींत बसून चित्रें पाहात होतास, तें म्या पाहिलें. आणि तूं कसेंरे आपल्या बापास नाहीं ह्मणून सांगितलेंस? आतांच मी तुझ्या बापास जाऊन कळवितों. " तेव्हां तो त्याचें मोठें आर्जव करून त्याला बोलला, " गड्या! असी गोष्ट करूं नको. मी तुला शरण आलों." मग तो ह्मणाला, " जर तूं मला चार आणे देसील, तर ही गोष्ट तुझ्या बापाच्या कानावर घालणार नाहीं." त्याप्रमाणें तो चार आणे द्यावयाचे कबूल करून घरांत आला; आणि पैसे कोठून मिळतील, असा विचार करीत बसला, इतक्यांत त्याला असी युक्ति सुचली, कीं आईने पेटींत धर्मादायाकरितां कांहीं खुर्दा ठेविला आहे, तो तीस न कळतां घ्यावा. असी मसलत करून आई कामांत गुंतलेली पाहून त्याने पेटी उघडून चार आणे चोरून घेतले, आणि त्या मुलास नेऊन दिल्हे. परंतु ही त्याची सर्व लबाडी लवकरच उघडकीस आल्यावर त्या दोघांसहि योग्य शिक्षा मिळाली.

एखादा गैरमाहित वाटसरू मार्ग चालत असतां त्याने जर कोणास विचारिलें, कीं " पुढचा गांव किती दूर आहे?" असें विचारल्यावरून तो जवळ न

सतां जवळच आहे, असें जर लबाडीने सांगितलें, तर त्यापासून किती नाश होतो, तो पाहा! तो वाटसरू मार्ग चालून थकल्यामुळें विश्रांति घ्यावयास कोठें तरी मुकाम करावा ह्मणून जागा शोधित असतो; परंतु जेव्हां त्याला समजतें, कीं पुढचा गांव जवळ आहे, तेव्हां जेथें मुकाम करावयाचा, तो न करितां पुढें चालता होतो; परंतु तो पुष्कळ लांब चालून गेला, तरी गांव आटोपेनासा होऊन त्याचे हात पाय गळून जातात. कदाचित् रात्र झाली, ह्मणजे त्याला भलत्याच ठिकाणीं राहावें लागतें; तेथें त्यास अनेक संकटें येऊन अशा प्रवासाचे श्रम त्याला इतके होतात, कीं त्यामुळें आजारी पडून मरणावस्थाहि प्राप्त होती. अशा ह्या लबाडीपासून दुसऱ्याचा किती नाश होतो, हें सर्वांनीं मनांत आणावें.

कांहीं वस्तु बाजारांतून विकत घेतली असतां जी किंमत तीस दिल्ही असेल , त्यापेक्षां अधिक किंमतीस घेतली असें दुसऱ्यास सांगणें, हें किती निंद्य आहे! पाहा! जो तुम्हापासीं पुसून घेतो, त्यास जर तसी जिन्नस घेण्याची असली, तर तुमच्या सांगण्यावर विश्वास ठेवून चौकसी न करितां तशा किंमतीस घेतो. मग जर त्यास ती वस्तु स्वस्त मिळती, असें समजलें, तर त्याला किती चटपट लागती! तेव्हां त्या गृहस्थाच्या

मनांत येतें, कीं सांगणारा लबाड आहे; त्याच्या बोलण्यांत ताळ नाहीं. असा निश्चय करून पुढें त्यासीं कांहीं व्यवहारसंबंध ठेवीत नाहीं. बरें, ज्या किमतीस आपण कांहीं वस्तु घेतली, तिजपेक्षां अधिक किंमत सांगणें, यांत काय लभ्यांश आहे ! तेणेंकरून उलटा अप्रमाणिकपणाचा मात्र डाग कपाळीं लागतो.

मुलास भलत्याच गोष्टींत लबाडी सांगितली, ह्मणजे पुढें त्यापासून आपला व त्याचाहि मोठा तोटा होतो. त्याला क्षुल्लक गोष्टीविषयीं ठकविलें, ह्मणजे तो आपणास मोठ्या गोष्टीविषयीं ठकवूं लागतो. मग त्या मुलाचा तुह्मावरील आणि तुमचा त्यावरील विश्वास नाहींसा होतो. जर कुटुंबांतील मनुष्यांस एकमेकांचा विश्वास नसला, तर त्या दुःखास पार नाहीं, असें समजावें. असा हा सर्व प्रकार एका सत्यावर दुर्लक्ष केल्यानें घडून येतो. सारांश, अशा लबाड्या केवळ बुद्ध्या करितात असें नाहीं; तथापि त्यांपासून अनर्थच होतात.

---

## असत्यामुळें संकटें येतात, याविषयीं विचार.

लबाड लोकांकडून कोणताहि धर्म सुरळीतपणें न होतां मातापितरांची सेवा घडत नाहीं. मग बायको

मुलें व भाउबंद यांचें कल्याण होणें कोठून. असे मनुष्य पृथ्वीवर कांत्यासारिखे दुसऱ्यास उपद्रव देत असतात. बरें लबाडांच्या टोळींत लबाड सुखी असतात असें ह्मणावें, तर तेंहि नाहीं; कारण त्यांना एकमेकांचा विश्वास नसल्यामुळें निरंतर त्यांमध्यें कलह होत असतो, आणि आपापल्यांत एखाद्याची प्रतारणा आढळली, ह्मणजे त्यास लागलेंच आपल्यांतून हाकून देतात. याप्रमाणें लबाडांचा देखील सत्यावांचून निर्वाह होत नाहीं.

ग्रीक देशांत प्लेटो नांवाचा एक मोठा विख्यात विद्वान् होऊन गेला; त्याने परब्रह्म ईश्वराचें एका ग्रंथांत वर्णन केलें आहे. त्यांत तो असें लिहितो, कीं "सत्य हें ईश्वराचें शरीर आहे, आणखी प्रकाश हा त्याची छाया आहे." हें वर्णन जरी केवळ कल्पित आहे, तरी यांमध्यें मोठा प्रौढ विचार दिसतो. या वर्णनावरून असें सिद्ध होतें, कीं असत्याचा ईश्वर फारच तिरस्कार करितो. प्लेटो याच्या मतानें चालणारे लोक केवळ सत्य हेंच परलोकसाधन करण्यास पुरे, असें मानून असत्याचा धिःकार करीत; आणि लोकांमध्यें सद्गुणांची वृद्धि होऊन त्यांचीं मनें प्रकाशित व्हावीं, याविषयीं फार झटत असत. असत्याचा प्रवेश लोकांच्या मनांत होऊं नये, ह्मणून

गणित इत्यादि नव्या नव्या विद्यांचा प्रसर करीत असत.

ईश्वर, लबाड लोकांस आपापल्या हातानें कसकसें शासन करवितो, याविषयीं एक गोष्ट—एका गांवांत राजी या नांवाची एक मुलगी राहत असे. तिला लहानपणापासून लबाडी बोलायाची खोड लागली होती, ती कांहीं केल्यानें जाईना. त्याजवरून लोकहि तिजवर विश्वास ठेवीत नसत. सहज एखादा पदार्थ खारट किंवा आंबट असला, आणि तो त्या मुलीनें तसा ह्मणून जरी सांगितलें, तरी कोणी तिचें खरें मानीत नसत. एका दिवशीं अशी गोष्ट झाली, कीं ती मुलगी रस्त्यांतून जात असतां तिचा पाय निसटून चरांत पडली, आणि पायास दुखापत होऊन तेथें चिखलांतच रडत बसली. मग मोठा आक्रोश करून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची काकळूत करून सांगे, कीं "मला वर काढा. माझा पाय मोडला, माझ्यानें उठवत नाहीं." असे तिचे करुणाशब्द ऐकून लोक त्या चराजवळ येत; परंतु तिच्या तोंडाकडे पाहतांच ह्मणत, कीं "अहो! ही मुलगी लबाड आहे. ही बोलती हें खरें कशावरून! कदाचित् ढोंग करून बसली असेल." असें ह्मणून तिजकडे पाठ फिरवून चालते होत. याप्रमाणें ती

मुलगी त्या चरांत दोन तीन तासपर्यंत चिखलांत रडत राहिली; परंतु तिला वर काढण्याच्या भरीस कोणी पडला नाहीं. तेव्हां ती थंडीनें कुडकुडूं लागली. शेवटीं त्या रस्त्यावरून एक गैरमाहित मनुष्य जात असतां तिची दशा पाहून त्यास दया उत्पन्न झाली; आणि त्याने तिला बाहेर काढून पाय खराच मोडला आहे, असें पाहून तिला गाडींत घालून घरीं पोंचतें केलें. पाहा ! ती फार वेळ त्या चिखलांत असल्यामुळें सर्दी होऊन तिची अत्यावस्था झाली. औषध उपाय पुष्कळ केले, तरी ती बरी झाली नाहीं. तिला खोकला लागला होता, तेणेंकरून तर तिचे फार हाल होत असत. जेव्हां तिला खोकला येई, तेव्हां तिच्या पायांत अधिक तिडका येत; त्यामुळें कांहीं वेळपर्यंत ती चळबळे. त्या वेळीं तिला आपल्या लबाडीचें स्मरण होऊन रडत रडत असें ह्मणे; कीं "हे परमेश्वरा ! मला ही लबाडी बोलायाची सवय लागली नसती, तर आज मी किती सुखी असतें."

## असत्यमार्गानें संपादन केलेलें द्रव्य लयास कसें जातें, याविषयीं उदाहरणें.

कोणी एका गृहस्थानें हा पुढील वृत्तांत सांगितला. कांहीं वर्षीमागें या देशांत दुष्काळ पडला होता, तेव्हां एका सधन गवळ्याजवळ पुष्कळ दुभत्या ह्मशी होत्या. त्या वेळीं त्यानें दूध महाग करून त्यांत पाणीं घालून तें विकीत असावें. असें करून त्यानें बराच पैका जमाविला, मग कांहीं दिवसानी तो तें द्रव्य घेऊन तारवांत बसून दुसऱ्या गांवीं जात असतां समुद्रांत मोठें तुफान झालें; त्यामुळें लोकांची नुकसानी होऊन गेली. तेव्हां त्या गवळ्याचें बहुतेक द्रव्य समुद्रांत बुडालें; त्या वेळीं तो मोठा शोक करीत बसला असतां जवळ कोणी एक भला स्पष्टवक्ता गृहस्थ होता; त्याला त्याचें कृत्रिम माहित होतें, तो त्यास ह्मणाला, "बाबा! आतां त्या गोष्टीविषयीं व्यर्थ कां शोक करीत बसलास? जें द्रव्य पाण्याचें होतें, तें पाण्यांत गेलें; आणि जें दुधाचें होतें, तें तुजपाशीं राहिलें. आतां पुढें तरी डोळे उघडून खरा व्यवहार करीत जा, ह्मणजे पुरें पडेल."

तसीच दुसरी एक गोष्ट— कोणी एकाने लष्करास भाकरीचें पीठ देण्याचा मक्ता घेतला; आणि तो असें करूं लागला, कीं त्या पिठांत बारीक सफेत

वाळू भेळी. असें पांच सहा महिने त्याने हें दुष्ट कर्म चालवून पांच पन्नास हजार रुपये मिळविले; आणि पुढेंहि पुष्कळ मिळवून एकदम लाखोपति होईन, असी इच्छा करी; परंतु ईश्वरानें कसें केलें, तें पाहा. त्या लष्करांत लोक एकाएकीं अतिसाराचा उपद्रव होऊन मरूं लागले. तेव्हां हा उपद्रव खाण्याच्या पदार्थांत कांहीं दगा झाल्यामुळें झाला असावा; असी कोणी वैद्यानें कल्पना काढून त्याविषयीं शोध केला असतां हें त्याचें कृत्रिम दृष्टीस आलें. मग तो अपराध त्याजवर लागू होऊन त्यास जन्मठेप मिळाली, आणि सर्व मालमत्ता जप्त करून सरकारांत नेली; अरेरे! ह्या एका लबाडीमुळें त्याचे किती हाल झाले!

या मुंबई बेटांत कोणी एक व्यापारी थोडक्या दिवसांवर एकाएकीं उदयास आला. त्याजपासीं पांचपंचवीस लक्षांची मायाहि झाली. सरकारदरबारांत त्याचा मोठा इतमाम चालूं लागला. कित्येकांस असें वाटे, कीं हा केवळ कुबेरच आहे. असें वैभव कांहीं वर्षें निभलें; मग तो उत्तरोत्तर गर्विष्ठ होऊन आपली स्थिति विसरला. पुढें लवकरच त्याचे काय हाल झाले, ते पाहा! कांहीं दिवसांनीं त्याचीं तर्कटें सरकारास समजल्यामुळें त्याजवर मोठा गुन्हा

शाबीत झाला; मग त्याची सर्व जिंदगी जप्त करून सरकारांत नेली. रथ, गाड्या, घोडे, सर्व जिकडचें तिकडे नाहींसें झालें. शेवटीं त्याला जन्मठेप होऊन काळ्या पाण्यावर पाठविलें. जो मनुष्य दोन दोन घोड्यांच्या रथांत बसून उंच उंच वस्त्रें वापरीत असे, त्याची पाहा काय दुर्दशा ! डोकीस बनातीची टोपी, अंगांत खादीची बंडी, गुढघ्यांपर्यंत चोळणा, आणि खांद्यावर घोंगडी, असा त्याला पोषाक देऊन या देशांतून पार केलें. अशा प्रसंगीं त्याचे इष्टमित्र, व द्रव्य कांहीं उपयोगीं पडलें नाहीं. ह्या असत्य मार्गाचा असा दुर्घट परिणाम आहे. हें मनुष्यमात्रानें लक्षांत आणून वागत असावें.

ग्लासगो शहरांतील लेटन नामें धर्माध्यक्ष मोठा धार्मिक असे. तो एके दिवसीं बाहेर फिरायास जात असतां दोघां ठक मनुष्यानीं त्यास पाहिलें. तेव्हां त्यांनीं मनांत आणिलें, कीं यास ठकवून याजकडून कांहीं द्रव्य हरण करावें. असी मसलत करून त्यांनीं असी युक्ति केली, कीं एक मेल्याचें सोंग घेऊन रस्त्याच्या बाजूस पडला, आणि दुसरा त्याचे जवळ रडत बसला. इतक्यांत हा धर्माध्यक्ष तेथून जाऊं लागला, हें पाहून तो रडणारा त्याजवळ आला आणि सांगूं लागला, कीं "माझा भाऊ एकाएकी

मरण पावला; त्याला पुरायास मजजवळ कांहीं पैका नाहीं; तर आपण कृपा करून मला कांहीं द्या, ह्मणजे मी त्यास मूठमाती देईन." तें ऐकून त्या भल्या गृहस्थानें त्यास कांहीं रुपये दिल्हे. ते घेऊन हांसत हांसत आपल्या सोबत्याजवळ येऊन त्यास उठवूं लागला, तों तो खरोखरच मेला. असें पाहून मोठा आक्रोश करीत त्या धर्माध्यक्षाकडे पुनः जाऊन आपलें कृत्रिम सांगितलें. तेव्हां त्यानें उत्तर केलें, कीं "बाबा! लबाडीचा असाच परिणाम आहे. याजवर माझा इलाज नाहीं. ही ईश्वरेच्छा आहे."

## न्यायप्रकरणीं असत्य बोलल्यानें किती अनर्थ होतात व सत्यापासून किती लाभ होतात याविषयीं.

न्याय ह्मणजे सत्यासत्याविषयीं निर्णय करून ज्याचा पक्ष खरा असेल, त्याच्या तर्फेनें न्याय ठरवून ज्याचा त्यास वाजवी हक्क देणें; आणि या कृत्यांत जर कोणी कृत्रिम करूं लागले, तर त्यांच्या दुराचरणांचें वर्णन काय करावें! न्याय करणारा जो

न्यायाधीश त्यास न्याय निवडण्यास मूळ आधार साक्षी; आणि तेच साक्षीदार जर लबाड असले, तर त्याने इनसाफ कसा करावा? खोटे साक्षीदार असले, ह्मणजे ते एक खोटी गोष्ट प्रतिपादन करावयास दुसऱ्या पांचपंचवीस खोट्या गोष्टी सांगतात; तेणेंकरून सत्याचा लोप होऊन न्यायाधीशास अमुक पक्ष खरा, व अमुक पक्ष खोटा, हें ठरवावयास मोठा विचार पडतो. कधीं कधीं असेंहि घडतें, कीं खोटा पक्ष धरणारा खरा होतो, आणि खरा पक्ष धरणारा खोटा होऊन जातो. अशा प्रसंगीं न्यायाधीशाकडेस कांहीं दोष नाहीं. हा सर्व दोष साक्षीदारांकडेस लागतो. ह्मणूनच खोटी साक्ष देणें हें सर्वांच्या शास्त्रांत अगदीं निषेधिलें आहे. हिंदुशास्त्रांत असें लिहिलें आहे कीं "जो खोटी साक्षी देतो, तो आपल्या पूर्वजांसहवर्तमान नरकांत जातो." ख्रिस्ती शास्त्रांतहि या कर्माचा निषेध केला आहे. तेथें असें सांगितलें आहे, कीं "तूं आपल्या शेजाऱ्याविरुद्ध अथवा दुसऱ्या कोणाविरुद्ध खोटी साक्ष देऊं नको." ईश्वरानें ज्या मुख्य दाहा आज्ञा दिल्ह्या, त्यांतलीच ही एक आहे. यावरून खोटी साक्ष देण्यांत किती पातक आहे, हें सहज ध्यानांत येईल.

जो पुरुष आपला मतलब साधावयाकरितां कोणत्याहि कारणावरून खोटी साक्ष देतो, तो आपली व दुसऱ्याची मोठी हानि करून घेतो. तो ह्या लोकीं आपली अप्रतिष्ठा करून घेऊन परलोकीं निरंतर नरकवास भोगण्याचें साधन करून ठेवितो. ज्या वेळीं न्यायाधीश साक्षीदारास समोर उभें करितो, तेव्हां तो त्यास निक्षून सांगतो, कीं "पाहा! तूं ह्या न्यायदरबारांत साक्षी देण्यासाठीं आला आहेस. तुझ्या साक्षविरून पुढें मी न्याय ठरविणार, तर तूं वाजवी न्याय ठरविण्यास माझें साह्य कर, देवाचें भय बाळगून आपल्या कल्याणावर लक्ष दे, आणि या प्रकरणीं जें जें तुला माहीत असेल, तें तें सत्य सांग. त्यांत कांहीं अणुरेणु इतकेंहि कमजास्त करूं नको. पाहा! ईश्वरापुढें तुला याचा हिशेब द्यावा लागेल." याप्रमाणें त्याला उपदेश केल्यावर तोहि कबूल करितो, कीं "जें सत्य असेल, तेंच मी बोलेन; असें सांगून शपत घेतो."

अरेरे! ह्याप्रमाणें शपत वाहून जो मनुष्य लोभांध होऊन खोटी साक्ष देतो, त्याच्या मूर्खपणास पार नाहीं, असें समजावें. आपण बोलतों काय! आणि करितों काय! याचें ज्याला भान नाहीं, तो मनुष्य केवळ पशु असें समजावें. अरे खोटी साक्ष देणाऱ्या! पाहा, तूं किती अनर्थ करितोस तो. ज-

र तुझी साक्ष एखाद्या खुनाच्या मुकद्दम्यांत असली आणि खून करणारा तुझा आप्त किंवा तुझी मूठ भरणारा असला, तर तुझ्या साक्षीवरून कदाचित् एखादा गरीब या जगांतून उठला जाईल; आणि त्याची बायको मुलें भिकेस लागतील. मग तीं जसजसीं दुःख पावतील, तसतसीं तुला तळतळाट देतील. जो दुष्ट मनुष्य खोटी साक्ष देऊन निरपराध्यास फाशांत पाडितो, तो, केवळ अघोरपातकी. एखाद्या अपराध्यास शासन न होतां तो सुटला, तर समयविशेषीं चालेल; परंतु निरपराध्यास विनाकारण दंड करविणें, हें रोमांच उभें राहावयाजोगें दुष्ट कर्म आहे. प्रसंगीं लुटारू मनुष्याची गांठ पडली, तर पत्करेल; परंतु असल्या दुष्टाचें तोंड पाहूं नये; कारण लुटारू मनुष्य द्रव्यहरण करण्याच्या लोभानें मनांत आवेश आणून दुसऱ्याचा नाश करितो; पण खोटी साक्ष देणारा स्वस्थ बसून हांसत खेळत चौघांमध्यें न कळतां दुसऱ्याचा गळा कापितो. कित्येक असेही आहेत, कीं एक दोन आण्यांच्या लोभामुळें देखील खोटी साक्ष देण्यास कबूल करितात.

जे लोक अशा अति निंद्य कर्मानें द्रव्य मिळवून कांहीं दिवस सुख भोगावयास इच्छितात, त्यांस धिःकार असो. अशा कुकर्मानें द्रव्यसंपादन करू-

न जरी हत्ती, घोडे, पालख्या, इत्यादि सुखें प्राप्त झालीं, तरी शेवटीं ते केवळ दुःखाचे अधिकारी, असें समजावें. अनाचारानें द्रव्य मिळविण्यापेक्षां हेलमजुरी करून पोट भरणें हें बरें.

मोठे श्रम घेऊन विद्या संपादन केली, व शास्त्रांचेंहि अध्ययन केलें, आणि अंगीं जर सत्य नसलें, तर ती विद्या कांहीं उपयोगाची नाहीं. आणि असली विद्या पुस्तकांची गोणी वाहणाऱ्या बैलासारिखी, असें समजावें. विद्या शिकावी; याचें फळ हेंच, कीं सद्गुण वाढवून ईश्वराची ओळख करून घ्यावी. विद्येपासून जर वाईट परिणाम होऊं लागले, तर ती काय कामाची! दुसऱ्याचा घात होईल, त्या विद्येपेक्षां अज्ञान बरें. कारण त्यामुळें अधिक नाश तरी होणार नाहीं. एका विद्वानाचें असें ह्मणणें आहे, कीं "विद्या संपादन करून जो नीतिशास्त्राप्रमाणें आपली वर्तणूक ठेवीत नाहीं, तो राजगृहीं भोजनास जाऊन परत उपाशीं आल्यासारिखा होय."

आफ्रिका खंडांतील रानटी लोक ज्यांस नीति आणि अनीति माहीत नाहीं; त्यांत देखील सत्यास मोठा मान देतात. पहा! जेव्हां कित्येक शिद्दी लोक या देशांत कांहीं माल विकावयास आणितात;

तेव्हां ते त्याची किम्मत वाजवीच सांगतात. आणि जी किम्मत त्यानी सांगितली, त्यांत जर कांहीं कमी कर ह्मटलें तर त्यांस मोठा राग येऊन ते असे शब्द बोलतात, "क्या हं झूटा है?" यावरून स्पष्ट दिसतें, कीं ईश्वराने मनुष्यास मूळस्थिति निष्कपटी दिल्ही; परंतु मनुष्य जसजसें धूर्त होऊं लागलें, तसतसें कृत्रिम करूं लागलें. शिद्दी लोक या देशांत येतात, तेव्हां धूर्त्त लोकांकडून दुसऱ्यास ठकवायास शिकतात. पहा! ही किती दुःखाची गोष्ट आहे! कीं जे देश सुधारत चालले, आणि ज्यांत विद्या, कलाकौशल्य फार त्या देशाचे दोष रानटी लोकांस लागून तेहि बिघडतात. याचें कारण एक सत्यावर दुर्लक्ष आहे ह्मणून.

कित्येकांचा असा समज आहे, कीं विद्या वाढवाव्या, ह्मणजे देशसुधारणूक होईल! मग लोक सहजच सत्यासत्याचा भेद समजून सद्गुणी होतील. तर केवळ विद्येपासूनच कल्याण होईल, अशी आस्था कोणी धरूं नये. विद्येपासून कित्येक लोकांचा नाशहि झाला आहे. खगोलविद्या, भूगोलविद्या, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, ज्योतिःशास्त्र, न्यायशास्त्र, व्याकरण, शिल्पशास्त्र, वैद्यशास्त्र, गणित, इत्यादि सर्व विद्या मनुष्यांच्या सुधारणुकेस कारण

भूत आहेत खऱ्या; परंतु जर त्या नीतिशास्त्राच्या आधाराने शिकविल्या, तर त्यांजपासून वास्तविक ज्ञान होऊन त्यांस सत्यासत्याचा भेद समजेल. नाहीं तर ह्या विद्यांपासून जेवढे गुण, तेवढे अवगुणाहि होतात. विद्येमुळें गर्व होऊन दुराचरणाची वृद्धि होती; मग असा मनुष्य लोकांस ठकवूं लागतो. ह्या विद्या ईश्वराच्या अपरिमित ज्ञानांच्या विभूति आहेत, असें त्याच्या लक्षांत न येतां तो आपल्या अंगीं अहंपणा आणितो.

डाकतर यंग असें ह्मणतो, कीं "खगोलविद्येचें अध्ययन करून मनुष्य निपुण झाला असतां जर त्याला ईश्वराच्या वैभवाचें ज्ञान न झालें, तर तो केवळ वेडा असें समजावें."

ही गोष्ट खरी आहे, कीं शहरांतील एखाद्या मनुष्याच्या अंगीं कृत्रिम अधिक असतें, आणि जसजसा तो हुशार होतो, तसतसी त्याचे अंगीं धूर्तता येती. अशा स्थितींत जर त्याला ईश्वराच्या भयांत वागविलें नाहीं, तर त्याजकडून कोणते प्रकारचा अनर्थ होईल, हें सांगवत नाहीं. विद्या कांहीं कमी असली, तर चालेल; परंतु त्याच्या अंगीं सदाचरण फार असलें पाहिजे; नाहीं तर तो दुराचरणी होऊन आपल्या विद्येच्या बळाने लोकांस ठ-

करूं लागेल. कदाचित् भलताच दावा सांगून गरीबगुरीबांच्या द्रव्याचा अपहार करून सुख भोगायास कांहींच दिक्कत मनांत आणणार नाहीं. असीं उदाहरणें या जगांत पुष्कळ सांपडतील. यास्तव केवळ विद्या वाढल्या, ह्मणून मनुष्य सद्गुणी झाला, असें ह्मणूं नये. एक इंग्लिश विद्वान् असें ह्मणतो, कीं "आकाश आणि पृथ्वी यांजमध्यें जितकें अंतर आहे तितकेंच विद्या, आणि खरें शाहणपण यांमध्यें अंतर आहे."

जो ईश्वराचें भय धरीत नाहीं, त्याला खोटी साक्ष देण्यास कांहीं अडचण वाटत नाहीं. प्रमाणिकपणा आणि अप्रमाणिकपणा यांचा भेद त्याला दिसत नाहीं. तो कोणत्या वेळीं काय बोलेल, याचा नियम नाहीं. लोकांत आपली अप्रतिष्ठा होईल, याविषयीं मात्र भीत असतो. ह्मटलें असतां जेथें विद्या फार झाली, तेथें अधिकाधिक सुशीलता असावी; परंतु तसें न होतां केवळ विपरीत प्रकार होण्याचीं कारणें बहुतेक वर सांगितलींच आहेत. ईश्वरी इच्छा असी आहे, जेथें विद्या अधिक, तेथें सद्गुणाहि अधिक असावे. याविषयीं ख्रिस्ती शास्त्रांत असा लेख आहे कीं "ज्याला पुष्कळ दिल्हें आहे, त्याजकडून पुष्कळ घेतलें जाईल." तर जे कोणी अज्ञानदशेंत दुराचरण करि

तात त्यांस थोडी शिक्षा मिळेल; परंतु जे ज्ञानावस्थेंत असून समजून उमजून अन्याय करितात, त्यांस फारच शिक्षा केली जाईल.

ह्या सर्व विद्या ईश्वरीगुणानुवादाकडेस लावून जर त्यांचा उपभोग घेतला, तर त्यांपासून सुखदायक परिणाम होऊन लीनता व सात्विकपणा प्राप्त होतो; मग ईश्वराच्या सर्वव्यापकतेचें परिज्ञान झालें, ह्मणजे मनुष्य आपला अहंपणा सोडून देतो.

**सर ऐझाक् न्यूटन्** नामें एक विख्यात विद्वान् ज्यानें पदार्थविज्ञानाविषयीं बहुत शोध केले, तो एका दिवशीं समुद्रकिनाऱ्यावर फिरत असतां एका चमत्कारिक शिंपीकडे पाहून ह्मणाला, हे जगदुद्धारका! तुझी अनंत शक्ति आणि अपार ज्ञान, यांपुढें माझी बुद्धि केवळ लहान बाळकाच्या बुद्धीपेक्षांहि कमी आहे; आणि आजपर्यंत जे म्यां शोध केले, ते असे आहेत, कीं एखाद्या बाळकाच्या हातीं साधारण खडा सांपडला असतां जसा तो पाहतच राहतो तसा मी आहें. "विद्यादधातिविनयं," असें वाक्य आहे.

ईश्वर सर्व विश्वाचा धनी असतांहि सत्याचें, आणि न्यायाचें कसें पालन करितो तें पाहा! ज्यास जसें असावें तसें त्यास तो देतो. नेमलेल्या काळीं प-

र्जन्य पाडून ऋतूंचीहि उलटापालट करितो. रात्र आणि दिवस यांस नेमाने चालवितो. ज्या काळीं जीं फळें उत्पन्न व्हावयाचीं, तीं उत्पन्न करितो. पाहा, हें किती सत्य आहे! कुणबी शेत नांगरून मातींत बीं पेरितो, आणि मोठ्या विश्वासाने त्यापासून धान्य मिळावयाची मार्गप्रतीक्षा करीत असतो. हा सर्व प्रकार एक ईश्वराच्या अपरिमित सत्यापासून घडतो. जर त्या कुणब्यास ईश्वराचा विश्वास नसता, तर तो तें बीं मातींत पेरता ना.

मनुष्याविषयीं ईश्वरी संकेत असा आहे, कीं लोकानी उद्योग केला असतां त्याचें फळ त्यांस द्यावें, कोणाचे श्रम व्यर्थ जाऊं देऊं नये. वहिवाटहि असीच आहे, कीं जे लोक उद्योगी आहेत, ते बहुधा सुखी व सधन असतात.

न्याय करणारा न्यायाधीश निःपक्षपाती, दयाळू, चतुर आणि दूरदर्शी असा असावा; त्याशिवाय त्यांच्या लक्षांत खराखोटा मुकद्दमा येणार नाहीं. साक्षी तपासतेवेळीं त्यानें फारच दक्षता ठेवावी. खोटी शपत घेणाऱ्यावर व खोटी साक्ष देणाऱ्यावर दुर्लक्ष झाल्यामुळें न्यायाचा फार गोंधळ होतो. कोणत्याहि मुकद्दम्याचा फैसल्ला करण्यास साक्षीदार सत्यवादी असले, तर त्यास विलंब लागत नाहीं. क

दाचित् पांच सहा दिवस व्यर्थ मोडून न्यायहि यथा-
योग्य होत नाहीं. यास्तव खोटी साक्ष देणाऱ्यास
शासन चांगल्या रीतीनें असावें. दोन तीन वर्षी-
मागें एक खुनाचा मुकद्दमा या मुंबई मुकामीं तपास-
ला गेला; त्या वेळीं साक्षीदार बरावर नसल्यामुळें
मुकद्दम्याचा तपास एक दोन दिवस एकसारखा रा-
त्रीपर्यंत चालत असे. त्यामुळें न्यायाधीशास व
दुसरे सभासदांस फार श्रम पडले. तेव्हां **सर अ-
र्स्किन् पेरी** मुख्य न्यायाधीश यानी मुकद्दम्याचा
फैसला करून कैद्यांस शासन करतेवेळीं प्रौढ भाषण
करून खोटे साक्षी असल्यामुळें काय हानि होती तें
व या देशांत खरे व खोटे साक्षी देणारे निवडून
काढण्यास किती श्रम पडतात, तें उघड करून दा-
खविलें.

मागें **सर पिटरग्राट** नामें ह्या मुंबई बेटांत एक
न्यायाधीश होऊन गेला; त्याच्या अंगीं खोटा सा-
क्षीदार ओळखण्याचें मोठें धोरण असे असें लोक सां-
गतात. मुकद्दम्याचा तपास चालत असतां साक्षीदा-
राची किंचित् लबाडी दिसून आली कीं त्याने ताब-
डतोब त्यास कैद करावें, व तो मुकद्दमा खोटा ठरवून
त्या साक्षीदाराचा पुनः तपास करावा; मग जर त्याने
खोटी साक्षी दिल्ही, असा गुन्हा त्याजवर शाबीत

झाला, तर त्याची धिंड काढून त्याला मोठा दंड करावा. त्या समयीं लोक खोटी साक्षी देण्यास फार भीत असत.

**मिसरदेशांत** न्याय करण्याचा बंदोबस्त फार चांगला असे, तो असा, कीं त्या देशांतील तीन मुख्य प्रांतांतले ३० असामी सुज्ञ व विद्वान् पाहून न्यायाधीश नेमून त्यांस जाहागिरी देत असत; आणि सर्वकाळ त्यांनीं न्याय चांगलेपणीं करावा, ह्मणून त्यांला दुसऱ्या कोणत्याहि अडचणी पडूं देत नसत. अशा रीतीने सरकारांतून बंदोबस्त झाल्यावर बादशाहा त्यांजकडून असी शपत घेत असे, कीं जरी मजकडून एखादा खोटा कायदा अमलांत आला, तरी तुह्मी कबूल करूं नये. मग ते न्यायाधीश निःपक्षपाताने न्यायाचा निवाडा करीत; व ज्याचा मुकद्दमा असेल, त्यासच मध्यस्थावांचून बोलण्याची मोकळीक देत; त्यामुळें त्या लोकांस कांहीं खर्च पडत नसे. एखादा आपल्या वक्तृत्वाने न्यायाधिशाच्या बुद्धीस विपर्यास पाडील, ह्मणून आपापला दावा कागदावर लिहून द्यावा, असा नेम केला होता, खोटी साक्ष देणाऱ्यास सुळीं देण्याचा कायदा होता; आणि कोणी कोणावर खोटी फिर्याद न करावी, ह्मणून असा

कायदा होता, कीं जी शिक्षा फिर्याद केलेल्यास व्हा-
याची, ती करणारास व्हावी.

**इंग्लंड्देशांत सर म्याथ्यु हेल्** नामें एक प्र-
ख्यात न्यायाधीश होऊन गेला; तो न्यायशास्त्रांत
निपुण असून निःसीम ईश्वरभक्त असे. जेव्हां तो
न्यायाधीश होण्याच्या पूर्वी कचेरींत वकिलाचें
काम करी, तेव्हां जरी, एखाद्याचा खोटा कज्जा अ-
सला, आणि त्यांत आपणास पुष्कळ द्रव्य मिळत
असलें, तरी तो हातीं न घेतां गरीबगुरिबाचें काम
फुकट करीत असे. तो असें ह्मणे, "द्रव्याच्या आ-
स्थेकारितां एखाद्याचा खोटा पक्ष धरून आपल्या अं-
तःकरणाच्या विरुद्ध भाषण करणें हें मनुष्यास मोठें
लांछन आहे." हा गृहस्थ न्यायशास्त्राचें मोठें भूष-
णच होऊन गेला.

**सर म्याथ्यु हेल्** यास जेव्हां मुख्य न्यायाधीशा-
चें काम मिळालें, तेव्हां तो निःपक्षपातानें, व निस्पृ-
हपणाने, न्याय करीत असे. एखादा मुकद्दमा नि-
वडावयास आला असतां त्याच्या तर्फेनें कोणाचें बो-
लणें, व शिफारस कबूल करीत नसे. एका दिवशीं
असें झालें, कीं **इंग्लांड** देशांतील एका नामांकित अ-
मिराच्या कज्जाचा निवाडा व्हावयाचा होता. तेव्हां

तो त्याच्या घरीं जाऊन असें सांगूं लागला, कीं "माझ्या कज्जांतील हशील तुमच्या ध्यानांत यावें, ह्मणून मी आलों आहें; तर तें आपण स्वस्थपणीं ऐकून घ्यावें." त्याचें असें भाषण ऐकतांच **सर म्याथ्यूने** तें बोलणें तहकूब करावयास सांगितलें, आणि ह्मणाला, कीं "दरबारांतील गोष्ट तुह्मी एथें येऊन सांगतां, हें अयोग्य आहे. न्यायप्रकरणीं जो फैसला व्हावयाचा, तो उभयपक्षांकडून बोलणें ऐकिल्यावर होईल. एथें मी एकतर्फी दावा कधीं ऐकून घेणार नाहीं." असें त्याचें भाषण ऐकून त्या अमिरास फार वाईट वाटून तो लागलाच राजाच्या घरीं गेला; आणि **सर म्याथ्यूने** माझा अपमान केला, असें दुःखाचें गाऱ्हाणें सांगितलें. तें ऐकून राजा ह्मणाला, कीं "इतक्यानेच त्याने तुला सोडिलें, ह्यांतच तुझी आब्रु रक्षण केली, असें समज; कारण जरी असली गोष्ट बोलायास मी स्वतः गेलों असतों, तरी त्याने माझी देखील प्रतिष्ठा ठेविली नसती."

दुसरी एक गोष्ट त्याविषयीं असी आढळली, कीं **सर म्याथ्यु** एक वेळीं बाहेरच्या जिल्ह्यांतील न्याय निवडण्यास फिरत असतां एका गृहस्थाने त्याला कांहीं भेट पाठविली. ती पाहतांच प्रथम त्याने असा तपास केला, कीं त्या गृहस्थाचा कांहीं मुकद्दमा आहे

कीं काय? आहे, असें समजल्यावर त्यानें त्या गृहस्थास सांगितलें कीं, "तुझी जी जिन्नस पाठविली, तिची किम्मत काय?" त्या वेळीं तो ह्मणाला, "मी कांहीं असे पदार्थ विकीत नाहीं; परंतु आजपर्यंत जे न्यायाधीश येत गेले, त्यांचा असाच परामर्श घेत आलों." तेव्हां जवळ जे संभावित गृहस्थ होते, त्यानी देखील त्याच्या अशा वहिवाटीचा पुरावा करून दिल्हा; परंतु तें **सर म्याथ्यूने** कबूल केलें नाहीं; आणि असें सांगितलें कीं "मला **सालोमनच्या** पुस्तकावरून असें कळलें आहे, कीं भेट घेतल्याने बुद्धि उलटती." यास्तव त्या भेटीचा पैका दिल्ह्यावांचून मी त्याचा मुकद्दमा कधीं हातीं धरणार नाहीं.

**सर थामस मोर** यास जेव्हां इंग्लंडदेशांत न्यायाधीशाची जागा मिळाली, तेव्हां तो फार निःपक्षपाताने इनसाफ करीत असे. आणखी कोणी कसाहि गरीब असला, तरी त्याला जवळ बोलावून त्याचा सर्व दावा ऐकून घेत असे. एखादा नातलग किंवा मोठा श्रीमंत असला तरी वाजवी इनसाफ करण्यास त्याला कांहींच अडचण पडत नसे. तो मुकद्दम्यांत काडीमात्रहि दंगा होऊं न देतां तो पुष्कळ दिवस लांबवीत नसे. याप्रमाणें त्याची न्याय

निवडण्याची शैली होती; तेणेंकरून लोक फार सुख पावत असत.

**लंडन** शहरांत **लार्ड होल्ट्** नामें एक फार निःपक्षपाती न्यायाधीश होऊन गेला; त्याविषयीं असें लिहिलें आहे, कीं तो न्याय व कायदा याविरुद्ध न चालतां रयतेच्या कल्याणाविषयीं फार जपत असे. एका समयीं अशी गोष्ट झाली, कीं राजाने एक नवीन कायदा केला, तेव्हां तो रयतेस नडेल, असें जाणून राजाच्या मतलबाप्रमाणें अमलांत न आणूं दिल्यामुळें राजास फार राग येऊन त्याला त्या कामावरून बरतर्फ केलें.

**ग्रीक** देशांतील **इपामिनेंडाज** हा जेव्हां न्यायाधीशाचें काम चालवीत असे, तेव्हां कित्येक लोक त्याला मोठमोठाल्या भेटी आणीत. त्या वेळीं तो त्यांला असें ह्मणे, कीं " जें काम तुह्मी मजकडून व्हावें असें इच्छितां; तें जर खरें असलें, तर त्याच्या खरेपणावरून मी करीन. त्याविषयीं मला कांहीं लांच देण्याचें कारण नाहीं; परंतु जर तें खोटें असलें, तर पृथ्वींतील सर्व संपत्ति मला मिळाली, तरी तें मी कबूल करणार नाहीं,,

**कार्नेल टेथान्** यास जेव्हां न्यायकचेरींत वकिलाचें काम मिळालें, तेव्हां त्यानें हे पुढील नेम

लिहून ठेविले होते; आणि त्याप्रमाणें आपण वागत असे:—

१ मी वकिलाचें काम करीन, कारण तेणेंकरून मला लोकांचें कल्याण करण्याचे प्रसंग पुष्कळ पडतील.

२ कोणी कितीहि गरीब असला, तरी मी त्याचा दावा ऐकून घेण्यास अनमान करणार नाहीं.

३ कज्जांत जितकी मला माहिती असेल, तितकीच मी मसलत देईन.

४ मी उगीच कोणास न्यायाबद्दल खर्चांत पडूं देणार नाहीं.

५ मी निराश्रित लोकांचें काम फुकट करीन.

६ ज्याचा कज्जा पत्करला, तो प्रमाणिकपणानें चालवीन, आणि सत्य कधीं सोडणार नाहीं.

७ कोणत्याहि कायद्यांत कदाचित् कोठेंहि बाध येणार नाहीं, असें मी कबूल करणार नाहीं.

८ दुसरा कोणी केवढाहि मोठा असला, तरी त्यास माझ्या आसामीपेक्षां अधिक मानणार नाहीं.

९ ज्या कज्जाचा निवाडा माझ्या आसामीच्या तर्फेने होईल, असें समजलें असतां तो कज्जा आपसांत चुकवूं देणार नाहीं.

१० दुराग्रही लोकांस न्यायाच्या खटल्यांत पडूं

नका म्हणून मी प्रमाणिकपणाने उपदेश करीन.

११ ज्याचा कज्जा असेल त्याला स्वतः चालविण्यास हक्क नाहीं, असें मी कबूल करणार नाहीं.

**माधवराव पेशवे** यांच्या कारकिर्दींत **रामशास्त्री** मोठे निःपक्षपाती, प्रमाणिक व न्यायी होते. त्यानी राज्यांत धुंदाई व अन्याय चालल्यामुळें गरीब रयत लोक फार त्रास पावतात, असें पाहून, ते एका दिवसीं **माधवराव पेशवे** यांच्या वाड्यांत गेले, आणि त्यांपासीं असें स्पष्ट भाषण केलें, “ महाराज! जर आपणाच्याने रयतेचें यथान्याय पालन होत नाहीं, तर राज्यकारभार सोडून यात्रेस जावें. राजाचा धर्म हाच, कीं यथान्याय प्रजेचें पालन करावें. तें जर त्याच्याने होत नाहीं, तर मग तो राजा काय उपयोगी?” असे स्पष्टवक्ते व न्यायी पुरुष ज्या राज्यांत पुष्कळ आहेत, त्यांत सुख नाहीं, असें कोण ह्मणेल!

कोणी एका गृहस्थाच्या मुलास न्यायशास्त्र शिकण्याची इच्छा झाल्यावरून त्याने आपल्या बापास असें पत्र लिहिलें, “ बाबा! मला न्यायशास्त्र शिकण्याची फार उमेद आहे; तर कृपा करून मला आज्ञा द्यावी. आज्ञा मागण्याचें हेंच कारण; कित्येकांचा असा समज आहे, कीं न्यायाच्या खटपटींत पडला

ह्मणजे मनुष्य ईश्वरास विसरतो; तर याविषयीं माझी खातरी व्हावी." तेव्हां बापानें असें उत्तर लिहिलें, "मुला! कोणतीहि विद्या, व धंदा हीं मुळचीं वाईट नाहींत; परंतु मनुष्य आपल्या दुराचरणेंकरून त्यांस बट्टा आणितो. न्यायशास्त्र पढणें हें तर फार उपयोगी आहे. मुख्य देवाची भीति मात्र धरिली पाहिजे; त्यामुळें गरीबगुरिबांचें कल्याण होतें. यास्तव तुला न्यायशास्त्र शिकण्यास मजकडून कांहीं प्रतिबंध नाहीं; परंतु इतकेंच मात्र ध्यानांत धर, कीं कोणत्याहि स्थितींत ईश्वरास विसरूं नको."

**स्काट्लंड देशांत आयरन्ग्रे** ह्मणून एक गांव आहे, तेथें एक कुणबी राहत असे; त्यास दोन मुली होत्या. त्यांतील एकीचें नांव **हेलेन** व दुसरीचें नांव **इझाबेल्ला**; त्या प्रौढ वयांत येतांच बाप मरण पावला. मग **हेलेन** जी वडील बहीण ती स्वतः उद्योग करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवूं लागली. कांहीं काळानें त्यांची आईहि मरण पावली. तेव्हां त्या दोघी बहिणी एकत्र राहिल्या असतां संसारखटलें **हेलेन** चालवूं लागली. त्या उभयतांची परस्परांवर फार प्रीति होतीच; आई मेल्यावर धाकटीची प्रीति वडील बहिणीवर अधिक बसली. पुढें दैववशात् असी गोष्ट घडून आली, कीं इझाबेल्लेवर

कांहीं मोठा आरोप येऊन तिला कायद्याप्रमाणें कैदेंत ठेविलें. तपास होण्याच्या पूर्वीं तिच्या तर्फेचा वकील घरीं येऊन वडील बहिणीस सांगूं लागला, कीं "पाहा! उद्यां तुझ्या धाकट्या बहिणीची चौकशी होणार. या मुकदम्यांत तुझी साक्षी मुख्य; तर तिजवर गुन्हा शाबीद होणें किंवा न होणें, हें बहुधा तुझ्या साक्षीवरच आहे. यास्तव ज्या वेळेस तूं साक्षी देण्यास उभी राहसील, त्या वेळेस फार जपून बोल; आणि जर तूं आपल्या बहिणीच्या विरुद्ध बोलसील तर तिची आस्था तुला सोडावी लागेल." असें ऐकतांच तिनें उत्तर केलें, कीं "मी कल्पांतींहि खोटी साक्षी देणार नाहीं. जें आहे, तें सत्य बोलेन; त्यापासून जें व्हावयाचें तें होवो." मग तिचा तपास झाल्यावर वडील बहिणीच्या साक्षीवरून दीड महिन्यानंतर तिला फांशीं द्यावें, असें ठरलें. त्या समयीं वडील बहिणीस फार दुःख झालें असतां तिनें एक अर्जी लिहून तयार केली; आणि ती स्वतः घेऊन अनवाणी चालत चालत **लंडन** शहरांत आली. तेथें एका प्रख्यात सरकारी कामदाराकडे जाऊन त्याजपासीं ती अर्जी दिल्ही. त्या भल्या गृहस्थास तिची बहिणीवरील प्रीति व सत्वस्थपणा पाहून मोठी दया आली. म-

ग त्याने पुष्कळ खटपट करून तिच्या बहिणीच्या अपराधाची राजाकडून क्षमा करविली. नंतर तो हुकुमनामा घेऊन ती लागलीच आपल्या देशास परत गेली, आणि बहिणीस वांचविलें. पाहा! सत्याचा कसा परिणाम झाला! त्या दिवसापासून हेलेनेची त्या गांवांत फार प्रख्याति झाली; आणि जरी ती गरीब कुणब्याची मुलगी होती, तरी मोठमोठाले लोक तिला मानूं लागले.

---

## असत्याची प्रवृत्ति होण्याचीं कारणें.

मनुष्यामध्यें काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, ह्या षड्रिपूंची वृद्धि होत चालली, ह्मणजे ते सत्याचा त्याग करून आपली इच्छा तृप्त करावयासाठीं खोटा मार्ग स्वीकारीत असतात. द्रव्याचा अतिलोभ झाला, ह्मणजे तें संपादन करण्यास ते काय अनाचार करतील, याचा विश्वास नाहीं. "द्रव्यलुब्धस्यनोसत्यं" जे द्रव्यलोभी आहेत ते समयानुसार अल्पलाभाच्या स्वार्थाकरितांहि असत्याचा अंगिकार करून अनर्थ करायास तयार होतात.

दुसऱ्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला, ह्मणजे मनुष्य त्याची न्यूनता शोधीत असतो, आणि त्याचा नाश

होईल, तितका प्रयत्नहि करितो. असें करण्यास कांहीं तरी कृत्रिमभाव असतो; त्याशिवाय तो सिद्धीस जात नाहीं. अशा प्रसंगीं असत्य अंगिकारावें लागतें, तें असें; कोणी चांगला विद्वान् व चतुर असला, तर त्याची विद्वत्ता तुच्छ करून त्याला कांहीं समजत नाहीं असें लोकांत प्रगट करणें; एखाद्याचें वर्म असेल, तें शोधून तो मोठा अपराधी, असें लोकांस समजवून देणें; क्षुल्लक गोष्टीवर मोठें कुभांड रचून तें वर्तमान पत्रांत छापून जाहीर करणें; हा सर्व प्रकार एका मत्सरामुळें होतो. एथें असत्य बोलण्याने कांहीं लाभ होतो, असा अर्थ नाहीं; परंतु मत्सऱ्याचा हेतु एवढाच, कीं दुसऱ्याची आब्रु खालीं व्हावी. बरें! जो दुसऱ्याची एवढी हानि करावयास धजतो, त्याचें तरी कल्याण होतें काय? तर तेंहि नाहीं. मत्सरी पुरुष आपलीहि नासाडी करून घेतो. द्वेष्टे लोकांचीं मनें नेहमीं व्यग्र असतात. मनुष्याच्या अंगीं एका दुर्गुणास जागा मिळाली, ह्मणजे त्यामुळें दुसरे दुर्गुण सोबतीस येऊन राहतात. मग त्यांचा एखाद्या महारोगासारखा फैलाव होऊन जातो.

कुटुंबांत अव्यवस्थितपणा चालला, ह्मणजे लहान मुलास सुशिक्षा लागत नाहीं, त्यामुळें असत्याचा प्रवेश होतो. मुलें अशिक्षित असलीं, ह्मणजे तीं

आपणाला मतलब साधण्यासाठीं लहानपणापासून लबाडी बोलून दुसऱ्यास ठकवितात; मग मोठेपणीं ते दुर्गुण तसेच राहून त्यांची वृद्धि होती. अशा कुटुंबांत बहुधा असत्य भाषण परंपरागत चालत येतें. त्यांत कोणी सुशील निघाला, तर मोठें भाग्य! याजविषयीं असें ह्मटलें आहे, कीं "तूं बाळपणापासून सत्यासच चिकटून राहा."

ईश्वराची भीति व त्याच्या सर्वव्यापकतेचा अनुभव नसल्यामुळें लोकांत असत्याची वृद्धि होती. जे लोक असत्य बोलतात, ते आपलीं सर्व कामें ईश्वर पाहतो, तो सर्व ठिकाणीं आहे, हें त्यांच्या ध्यानांत नसतें.

लोक, लबाडाचा ज्या रीतीने धिःकार करावा, त्या रीतीने करीत नाहींत; सबब असत्याची वृद्धि होती. असत्यमार्गानें द्रव्य कमावून जर कोणी द्रव्यवान् झाला, तर त्याच्या दोषाकडे न पाहतां उलटी त्याची स्तुति करूं लागतात. लबाड लोकांत आणि सत्यशील लोकांत भेद ठेवीत नाहींत. जसी असत्यवादी द्रव्यवानाची बडेजाव होती तसी भल्याची होत नाहीं; त्यामुळेंच लोकांचा असा समज पडून गेला आहे, कीं लबाडी बोलल्याशिवाय द्रव्य

मिळत नाहीं. सत्यवादी असून गरीब असला, तर त्यास कोणी विचारीत नाहीं.

नीतिशास्त्राचें परिज्ञान नसल्यामुळें असत्याचा विस्तार फार होतो. असत्याचा परिणाम काय होतो, हें मनुष्याच्या लक्षांत येत नाहीं; सत्याचें पालन व उल्लंघन कोणत्या गोष्टीने होतें, त्याचें ज्ञान नीतिशास्त्रावांचून पक्कें होत नाहीं. कित्येकांचा असा समज आहे, कीं आपण कारणपरत्वें असत्य बोललों, तर त्याचा दोषनिवारण होण्यासाठीं कांहीं तरी सत्कर्म केलें, ह्मणजे झालें. दुसरे कित्येकांचें असें मत आहे, कीं जन्मभर असत्य मार्गानें द्रव्य संपादन करून संसार चालविला, तरी चिंता नाहीं; परंतु अंतकाळीं तो दोष जाण्यास कांहीं धर्म करावा, किंवा प्रायश्चित्त घ्यावें, ह्मणजे आपण पुण्यवान् होऊं. पाहा! अशा समजुतीमुळें सत्याची योग्यता कमी होती. लोकांस असें वाटतें, कीं हें काम फार सोपें आहे. सध्या द्रव्य कमावून सुख तर भोगूं; मग शेवटीं कांहीं तरी खर्च केला, ह्मणजे ईश्वरापासीं निर्दोषी ठरले जाऊं. ह्या अशा अज्ञानामुळें फारच असत्याची वृद्धि होती; तर या समजुतीस काय ह्मणावें! सर्वदां पातक करावें, आणि शेवटीं द्रव्य खर्चून तें दूर करूं; असी आस्था धरावी, हें किती विरुद्ध! जो ईश्वर महा पवि-

त्र, तो अशा क्षुल्लक गोष्टींनी कसा संतुष्ट होईल! पाहा! एखाद्या गरिबाच्या द्रव्याचा समजून उमजून अपहार करून धर्म करणें, यांत काय श्रेय! उलटी हानि मात्र होती. यास्तव असत्य बोलणें हें महापातक; आणि तें निवारण करण्यास ईश्वरकृपेवांचून कोणाचेंच सामर्थ्य नाहीं, असें स्पष्ट समजावें.

अल्पदृष्टि व भित्रेपणा अंगीं असल्यामुळें असत्याचा आश्रय धरितात; कारण ज्याची अल्पदृष्टि असती, तो प्रस्तुतच्या लाभावर नजर देऊन कृत्रिमभावाने आपलें कार्य साधून घेतो; तसेंच ज्याच्या अंगीं धैर्य नसतें, तो दुसऱ्याची खुशामत करितो; यास्तव सत्याचें पालन करण्यास दीर्घदृष्टि आणि धैर्य अवश्यक असावें. मनुष्यास सत्य बोलण्याची सवय लागायासाठीं जसे श्रम घ्यावे लागतात, तसीच सत्य भाषण ऐकून घेण्याची सवय लाविली पाहिजे. कित्येक लोक जरी स्वतः असत्य बोलायास भितात, तरी दुसऱ्याने आपली व्याजस्तुति केलेली ऐकून खुश होतात. जे लोक निस्पृह आहेत, ते दुसऱ्याची मिथ्यास्तुति करणार नाहींत; व ऐकूनहि घेणार नाहींत.

कर्जामुळेंहि असत्य फार वाढतें. एखाद्याचें कर्ज घेतलें, आणि तें मुदतीप्रमाणें फेडायास न मि-

बोलावें लागतें, तें सां-
ळालें, ह्मणजे किती असत्य
गवत नाहीं. ऋणापासून कोणकोणते अनर्थ घ-
डतात ते ग्या एका ग्रंथांत लिहिले आहेत; ह्मणून
एथें कांहींच वर्णन करीत नाहीं. कोणीएक शहा-
णा असें ह्मणतो, " कर्ज केलें, ह्मणजे त्याच्या
मागें खोटें बोलणें आलेंच असें समजावें. " भल्या म-
नुष्यास सत्य सोडणें फार कठीण पडतें; परंतु तो का-
य करील, कर्जदाराचें तोंड पाहिलें ह्मणजे अंगीं कां-
परा सुटतो, मग अर्थातच ती वेळ टाळण्याकरितां
त्याला असत्याचा अंगिकार करावा लागतो.

स्त्रिया सुशिक्षित नसल्यामुळें असत्याची वृद्धि होती, यास्तव त्यांस सुशिक्षित करावें. या विषयावर पूर्वी बहुतांनीं लिहिलें आहे, व हल्लींहि या प्रकरणीं ग्रंथ तयार होत आहेत, ह्मणून या प्रसंगीं लिहीत नाहीं; परंतु एवढेंच सुचवितों, कीं स्त्रियांच्या अशिक्षितपणामुळें असत्याचा फारच विस्तार होऊन गेला आहे.

## सत्याची वृद्धि होण्याचे उपाय.

सत्य हा एक मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यावांचून ऐहिक किंवा पारलौकिक साधनें घडावयाचीं नाहींत, असें लक्षांत आणून सर्वकाळ तें धारण करावयास मनु-

ष्याने उद्युक्त असावें. जे सत्यवादी असतील, त्यांस मान देत असावा. कोणी सत्य बोलूं लागला, ह्मणजे त्याजकडून जितकें सत्याचें रक्षण होईल, तितकें करविण्यास त्याची मदत करावी. नेहमी असत्याचा तिरस्कार करीत असावा. लबाड लोकांची पुढें कसी फजीती होती, आणि ते कसे लाचारींत येतात; याविषयीं बारंवार घरांतील मनुष्यांस सावध करीत असावें. तसेंच ईश्वरास लबाडीचा किती कंटाळा आहे, हेंहि त्यांच्या अंतःकरणांत बिंबावयासाठीं फार झटत असावें. लबाड लोकांची संगति कधींहि धरूं नये. हितेच्छु लोकानी दुसऱ्याचें अज्ञान दूर करायास अभिमान धरून त्यांस सुधारावें; ह्मणून स्वतः मेहनत घेत असावी. तसेंच कामादि षड्रिपूंचें प्राबल्य न होण्यासाठीं दुर्गुणाचें खंडन करून सद्गुणांची वृद्धि करीत असावी. विनोदामुळें कदाचित् लोक असत्याचा अंगिकार करितात; तर आपला विश्वास परस्परांवर बसावा, ह्मणून मस्करींतहि असत्य बोलूं नये. घरांतील मुलांकडून किंवा कोणत्याहि मनुष्याकडून लबाडी घडली असतां तिचा लागलाच शोध करून त्यास यथायोग्य शिक्षा व बोध करावा. असत्याचा लोप व्हावा, ह्मणून ईश्वराची नेहमीं प्रार्थना करीत असावी.

आळस हा एक महा दुर्गुण आहे, आणि त्यामुळें असत्याची प्रवृत्ति होती. मनुष्याचा चरितार्थ चालत नाहींसा झाला, ह्मणजे मग तो आपली उपजीविका चालविण्यासाठीं दुसऱ्यास ठकविण्याच्या हरयुक्ति काढितो. त्या अशा, कीं एखाद्याची भलतीच गोष्ट दुसऱ्यास सांगणें; तसेंच व्यर्थ स्तुति करणें; अमुक काम करीन, ह्मणून वचन देऊन आपला मतलब साधणें यास्तव घरांत आळसाचा प्रवेश होऊं देऊं नये. लोकांत सत्याची प्रवृत्ति व्हावी, ह्मणून एकमेकांस चांगले उद्योग लावून द्यावे. उद्योग न केला, ह्मणजे काय विचारितां! मग जिकडे तिकडे असत्याचा सुकाळ होतो. याकरितां ह्या गोष्टीवर लक्ष देऊन चांगल्या उद्योगांची योजना करावी. जर मनुष्यांचें मन नेहमी उद्योगांत निमग्न असलें, तर वाईट कल्पना करायास अवकाश कोठून सांपडणार? जे उद्योगी आहेत, त्यांस श्रमाचे पोटीं कमजास्त द्रव्य मिळूं लागलें, ह्मणजे ते असत्य बोलून दुसऱ्यावर कुभांड रचायाच्या भरीस पडत नाहींत.

ज्या लोकांची असत्यांत प्रवृत्ति झाली, त्यांस सत्याचा बोध करून सुरळीत मार्गांत आणणें मोठें कठीण आहे. "सत्य बोलत जा." असा जर ए-

खाद्यास उपदेश केला, तर त्याला तो न आवडतां उलटा रागें भरेल. तोच उपदेश त्याला हरयुक्तीनें सत्याविषयीं चांगलीं उदाहरणें दाखवून त्यापासून किती लाभ होतात, हें त्याच्या मनांत ठसविलें असतां तो बहुधा सत्याचा अंगिकार करील. असत्यवाद्यांस सत्याची गोडी लागण्यासाठीं मोठा यत्न केला पाहिजे. तो बलात्काराने सिद्धीस जाणार नाहीं; परंतु त्यांस असें दाखवावें, कीं ज्यानी सत्याचरण धरिलें, ते किती सुखी; व सत्वशील पुरुषानी सत्याचें पालन करण्यास किती श्रम घेतले; व त्यामुळें त्यांची केवढी कीर्त्ति झाली! त्यांस बोध करतेवेळीं कल्पित गोष्टी रचून भलतींच उदाहरणें देऊं नयेत. एखाद्या गोष्टीपासून पुढें कांहीं चांगलें निष्पन्न होईल, ह्मणून असत्याचा आश्रय करूं नये. सर्वकाळ सत्यच धरून चालावें; आणि ईश्वरी कृपा मिळविण्यास यत्न करीत असावा.

समाप्त.